

ईद 2026 ला पाच भाषांत रिलीज होईल 'धुरंधर 2'

(पान ६ वर)

दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक



आपली पोरं सांभाळू शकली नाहीत ते मुंबई काय सांभाळणार? एकनाथ शिंदेंचा ठाकरे बंधूंच्या युतीवर टोला

(पान ८ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ E-mail : divyawatan@gmail.com गुरुवार दिनांक २५ डिसेंबर २०२५ अंक : १४१ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८

# अखेर ठाकरे बंधूंच्या युतीची घोषणा

### मराठी माणसाच्या अस्तित्वावर उठलेल्यांना गाडून टाकण्यासाठी युती केली

### मुंबईचा महापौर हा शिवसेना-मनसेचाच असणार; राज ठाकरेंनी मांडली भूमिका

**या मुंबईत महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना, या दोन पक्षांची आगामी महापालिका निवडणुकांसाठीची युती घोषित झाली. महाराष्ट्र नवनिर्माण सेना अध्यक्ष म्हणून मी आणि शिवसेना पक्षप्रमुख म्हणून उद्धव ठाकरे अशी आम्ही दोघांनी या युतीची अधिकृत घोषणा संयुक्त पत्रकार परिषदेत केली, अशी माहिती मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी त्यांच्या सोशल मीडिया पोस्टद्वारे केली आहे. राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत युती संदर्भात तसेच आगामी महापालिकेच्या अनुषंगाने आपले मत व्यक्त केले आहे. तसेच मराठी माणसाच्या अस्तित्वावर उठलेल्यांना गाडून टाकण्यासाठी युती केली असल्याचे त्यांनी म्हटले आहे.राज ठाकरे म्हणाले, ही युती बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित होती. आणि या सगळ्याची सुरुवात, मी एका मुलाखतीत दिलेल्या वाक्यातून झाली. कुठल्याही वादापेक्षा आणि भांडणांपेक्षा आपला महाराष्ट्र आणि मराठी माणूस मोठा आहे.' हे माझं वाक्य होतं. हे निव्वळ मुलाखतीतलं वाक्य नाहीये, तर ही तीव्र भावना आहे आणि यातूनच हे २ पक्ष एकत्र आले आहेत. बाकी युतीची घोषणा झाली. आता कोणाला कुठल्या आणि किती जागा मिळणार याची उत्तरं लवकरच मिळतील. त्यावर आजच्या व्यासपीठावर कुठलीही माहिती सांगितली नाही, कारण त्या तांत्रिक बाबी आहेत.**



**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या युतीची घोषणा झाली. ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी येथील एका हॉटेलात आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत या युतीची घोषणा करून BMC निवडणुकीच्या प्रचाराचे रणशिंग फुंकले आहे. यावेळी त्यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या राजकीय खात्म्याचा निर्धार व्यक्त करत मुंबईतील मराठी माणसांना एकत्र येण्याचे आवाहन केले.

दरम्यान, मुंबईसह राज्यभरातील ठाकरे घराण्याच्या चाहत्यांची राज व उद्धव ठाकरे एकत्र येण्याची इच्छा होती. आज ही त्यांची इच्छा राजकीयदृष्ट्या पूर्ण झाली.राज ठाकरे म्हणाले, आम्ही आमची भूमिका जाहीर सभांतून मांडूच. परंतु, मागे एक मुलाखत झाली होती. मी मुद्दामहून आठवण करून देतो त्या गोष्टींची... त्यात मी असे म्हणालो होतो की, कोणत्याही वादापेक्षा व भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. मला असे वाटते की, या एका वाक्यापासून आम्ही एकत्र येण्याची सुरुवात झाली. कोण किती जागा लढवणार, आकडा काय, हा नाही सांगणार तुम्हाला. महाराष्ट्रात सध्या लहान मुले पळवणाऱ्या खूप टोळ्या फिरत आहेत. त्यात दोन टोळ्यांची भर पडली आहे. त्या राजकीय पक्षांमधील मुले पळवतात.जे निवडणुका लढवणार आहेत, त्या लढवणाऱ्या सर्व उमेदवारांना दोन्ही पक्षांकडून उमेदवारी दिली जाईल. ती कधी भरायची केव्हा भरायची आपल्याला कळवले जाईल. आज फक्त आपल्यापुढे मी एकच गोष्ट सांगू इच्छितो की, महाराष्ट्र बऱ्याच दिवसांपासून ज्या गोष्टीची प्रतिक्षा करत होता ती शिवसेना व मनसेची युती झाली हे आज आम्ही जाहीर करत आहोत. धन्यवाद.

उद्धव ठाकरे म्हणाले, आज केवळ महाराष्ट्रच नाही तर संपूर्ण देश या घटनेकडे पाहत आहे. मी सर्वांना विनंती व आवाहन करतो की, मागे विधानसभेच्या वेळी भाजपने बटेंगे तो कटेंगा हा अपप्रचार केला होता. मी मराठी माणसांना सांगतो, आता चुकाल तर संपाल, आता फुटाल तर पूर्णपणे संपून जाल. त्यामुळे तुटू नका, फुटू नका. मराठीचा वसा टाकू नका. हाच एक संदेश मी आमच्या दोघांच्या युतीच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्राला देत आहे. मला खात्री आहे की, मराठी माणूस कुणाच्या वाटेला जात नाही. पण त्याच्या वाटेला कुणी आला तर त्याला परत जाऊ देत नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

## महत्त्वाचे...

### एकनाथ शिंदे अन् रवींद्र चव्हाण यांच्यात 5 तास चर्चा



मुंबई- राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी सर्व राजकीय पक्षांनी रणशिंग फुंकले गेले असून, या पार्श्वभूमीवर महायुतीने आपली पूर्ण ताकद मैदानात उतरवली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यात सोमवारी रात्री उशिरापासून ते मंगळवारी पहाटे 4 वाजेपर्यंत जागावाटपाबाबत मॅरेथॉन बैठक रंगली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे येथील निवासस्थानी ही बैठक पार पडली. या बैठकीत मुंबई, ठाण्यासह राज्यातील प्रमुख महापालिकांच्या जागावाटपाचा पेच सुटल्याची चिन्हे असून, लवकरच महायुतीकडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर होण्याची शक्यता आहे.निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, राज्यातील 29 महापालिकांसाठी 15 जानेवारी रोजी मतदान होणार असून, 16 जानेवारीला निकाल जाहीर होतील. या अल्प कालावधीत प्रभावी मोर्चेबांधणी करण्यासाठी महायुतीच्या नेत्यांनी रात्रीचा दिवस केला आहे. एकीकडे आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या युतीची आज घोषणा होणार आहे.

### मुंढवा - मांजरी रस्त्यावर डंपरची धडक




मुंढवा-मांजरी रस्त्यावर भरधाव डंपरच्या धडकेत एका दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी डंपरचालकाविरुद्ध मुंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना नुकतीच घडली. मृत्यू झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव भूषण कैलास अहिरराव (वय ३५, रा. अर्थव कॉम्प्लेक्स, मांजरी बुद्रुक) असे आहे. भूषण यांचे भाऊ पंकज कैलास अहिरराव (वय ३२) यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भूषण आणि पंकज हे दोघेही खासगी ठिकाणी नोकरी करतात. मुंढवा-मांजरी रस्त्यावरून जात असताना समोरून येणाऱ्या भरधाव डंपरने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात भूषण गंभीर जखमी झाले, तर पंकज यांनाही दुखापत झाली. अपघातानंतर डंपरचालक घटनास्थळावरून पसार झाला.गंभीर जखमी झालेल्या भूषण आणि पंकज यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान भूषण यांचा मृत्यू झाला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता वासनिक यांनी घटनास्थळी भेट दिली असून, पसार झालेल्या डंपरचालकाचा शोध सुरू आहे. पोलीस उपनिरीक्षक कविराज पाटील या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.
दुसऱ्या घटनेत हडपसर-सासवड रस्त्यावरही भरधाव टेम्पोच्या धडकेत एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.
याप्रकरणी फुरसुंगी पोलिसांनी टेम्पोचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.मनोहर वामनराव धर्माधिकारी (वय ५७, रा. धर्माधिकारी चाळ, नेहरूनगर, पिंपरी) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. धर्माधिकारी यांच्या पत्नी उषा (वय ४७) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, धर्माधिकारी हे हडपसर-सासवड रस्त्याने जात असताना भेकराईनगर परिसरात भरधाव टेम्पोने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या धर्माधिकारी यांचा उपचारांदरम्यान मृत्यू झाला.

# भाजप नेत्यांना कुडाळ कोर्टाचा दणका:मंत्री नीतेश राणेंसह दोन आमदारांविरोधात अजामीनपात्र अटक वॉरंट

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ न्यायालयाने भाजपचे आमदार नीतेश राणे, प्रसाद लाड आणि प्रवीण दरेकर यांना मोठा कायदेशीर दणका दिला आहे. 'संविधान बचाव' आणि ओबीसी आरक्षणासाठी केलेल्या आंदोलनाशी संबंधित एका प्रकरणात न्यायालयाने या तिन्ही नेत्यांविरोधात अजामीनपात्र अटक वॉरंट जारी केले आहे. वारंवार न्यायालयाच्या सुनावणीला गैरहजर राहिल्यामुळे न्यायालयाने हा कठोर निर्णय घेतला आहे.



हे प्रकरण २६ जून २०२१ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यात झालेल्या आंदोलनाशी संबंधित आहे. त्यावेळी ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून भाजपने 'संविधान बचाव' आंदोलन केले होते. या आंदोलनादरम्यान नियमांचे उल्लंघन झाल्याचा ठपका ठेवत कुडाळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात माजी आमदार राजन तेली, आमदार नीतेश राणे, नीलेश राणे आणि प्रसाद लाड यांच्यासह एकूण ४२ जणांचा आरोपी म्हणून समावेश आहे.या प्रकरणाची सुनावणी कुडाळ न्यायालयात सुरू आहे. आज झालेल्या सुनावणीला नीलेश राणे, राजन तेली आणि इतर काही आरोपी न्यायालयात हजर होते. मात्र, आमदार नीतेश राणे, प्रसाद लाड, प्रवीण दरेकर यांच्यासह अन्य पाच जण गैरहजर राहिले. नीतेश राणे यांच्या वकिलांनी त्यांच्या गैरहजेरीबाबत न्यायालयात सवलतीचा अर्ज दिला होता.

# संत ज्ञानेश्वर उद्यानात नाताळ, नववर्षाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी-पर्यटकांची गर्दी दररोज देताहेत २ हजार पर्यटक भेटी, नाथसागराचाही घेताहेत आनंद

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई- नाताळ व नववर्षाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सहलीमुळे मागील पंधरा दिवसांत पैठणला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढली आहे. पैठणचे संत ज्ञानेश्वर उद्यानसह इतर ठिकाणे पर्यटकांनी गजबजली आहेत. दररोज २ हजारांहून अधिक पर्यटक पैठणला भेट देत आहेत.

संभाजीनगर मार्गाचे चौपदरीकरणाचे काम पूर्ण होत आले आहे. संत ज्ञानेश्वर उद्यान सुरू झाले असून शहरातील धार्मिक व पर्यटनस्थळांचा विकास करण्यात आला आहे. नाथमंदिर परिसरातील विविध धार्मिक देखावे भक्तांना आकर्षित करणारे आहेत. येथे येणाऱ्या भक्तांच्या संख्येत देखील वाढ झाली असल्याचे नाथ संस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा बारे यांनी सांगितले.

उद्यान सुरू झाल्याने व्यापार वाढणार: संत ज्ञानेश्वर उद्यान परिसरातील व्यापारी व हॉटेल व्यावसायिकांमध्ये संत ज्ञानेश्वर उद्यान सुरू झाल्याने नवचैतन्य निर्माण झाले आहे. नाताळ-नववर्षाच्या व सध्या प्रचंड सहली विद्यार्थ्यांच्या येत असल्याने या महिन्यात मोठ्या प्रमाणावर



पर्यटक शहरात दाखल होत आहेत. या परिसरातील लहान-मोठ्या हॉटेल चालकांना यामुळे चांगले दिवस आले आहेत, असे व्यापारी महासंघाचे माजी अध्यक्ष पवन लोहिया यांनी सांगितले. येथे भव्य विविध शिल्पे तयार करण्यात आली आहेत. ही शिल्पे नाथभक्तांसह पर्यटकांना आकर्षित करत आहेत. जायकवाडी धरण, जगप्रसिद्ध ज्ञानेश्वर उद्यान, पैठणी साडी केंद्र, संत एकनाथ समाधी मंदिर व वाडा, संत ज्ञानेश्वरांनी रेड्यास वेद वदवलेले स्थान, शालिवाहन राजाचा राजवाडा, पालथी नगरी आदी ऐतिहासिक, धार्मिक व पर्यटनस्थळांमुळे पैठणला वर्षभर भाविक-पर्यटकांची वर्दळ असते. विशेष डिसेंबरमध्ये शालेय सहलींसह पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते.

यंदा मात्र पर्यटकांची संख्या काही पट वाढली असल्याचे संत ज्ञानेश्वर उद्यानचे अभियंता तुषार विसपुते यांनी सांगितले.

# काँग्रेस-रासप मनपा अन् जिल्हा परिषद एकत्र लढणार

### हर्षवर्धन सपकाळ आणि महादेव जानकरांची मोठी घोषणा, ठाकरे बंधुंनाही दिल्या शुभेच्छा

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई- राज्यातील नगरपालिका निवडणुकीनंतर होत असलेल्या महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांसाठी काँग्रेस पक्ष सज्ज असून नगरपालिका निवडणुकाप्रमाणेच या निवडणुकीतही समविचारी पक्षांना सोबत घेण्याची काँग्रेसची भूमिका आहे. महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये काँग्रेस व राष्ट्रीय समाज पक्ष एकत्र लढणार असल्याचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जाहीर केले.

टिळक भवन येथे आज राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर व काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यात आज आघाडीबाबत



सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी पत्रकार परिषदेत आघाडीची घोषणा केली.

यावेळी पत्रकारांशी बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, महादेव जानकर हे बहुजन समाजाचा आश्वासक आवाज आहेत. देशात लोकशाही व संविधान पायदळी तुडवण्याचे काम भारतीय जनता पक्ष करत आहे अशा प्रसंगी समविचारी पक्षांनी एकत्र येऊन लढण्याचा निर्णय झाला आहे. नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीत आघाडीची औपचारिक घोषणा केलेली नव्हती पण सातारा, सांगली तसेच मराठवाडा व विदर्भात एकत्र निवडणुका लढलो आहोत आणि तीच भूमिका आज पुढे घेऊन जात आगामी काळात सोबत राहण्याचा निर्णय झाला आहे.

राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर यावेळी म्हणाले की, शिव, शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार घेऊन काम करत असताना समविचारी पक्षांनी एकत्र असावे या भावनेतून लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांची दिल्लीत भेट घेतली होती.

काँग्रेसबरोबर रासपची आघाडी ३१ मे रोजीच झाली आहे. राहुल गांधी हे देशातील तरुण, महिला, आदिवासी, गोरगरीब, मागासवर्गीय यांचा आवाज बनून काम करत आहेत. जागा किती मिळणार यापेक्षा आजघडीला संविधान व लोकशाही वाचवण्याची नितांत गरज आहे.

# आता नगराध्यक्षांनाही मिळणार मताचा अधिकार

### सरकार कायद्यात सुधारणा करण्यासाठी काढणार अध्यादेश

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई- राज्य सरकारने आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या थेट निवडून आलेल्या अध्यक्षास सदस्यत्व देण्यासह मताचाही अधिकार देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे भविष्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये बहुमताचा प्रश्न उद्धवला तर नगराध्यक्षांना आपले मत योग्य त्या पक्षाच्या पारड्यात टाकून प्रकरण निकाली काढता येणार आहे. हा बदल सत्ताधाऱ्यांना अनुकूल असल्याचा दावा केला जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत सामान्य प्रशासन विभाग, ग्रामविकास व पंचायत राज



विभाग, महसूल व नगरविकास विभागाशी संबधित प्रत्येकी 1 निर्णय घेण्यात आला. मंत्रिमंडळाने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मध्ये अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या थेट निवडून आलेल्या अध्यक्षास सदस्यत्व मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. तसेच त्याला मताचाही अधिकार मिळेल. नगर विकास विभागाचा हा एक महत्त्वाचा निर्णय आहे.

नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असलेली व्यक्ती अध्यक्ष म्हणून निवडून येण्यास पात्र असते. त्यामुळे एखादी व्यक्ती अध्यक्ष म्हणून आणि त्याचवेळी सदस्य म्हणून निवडून येऊ शकते आणि दोन्ही पदावरही निवडून येऊ शकते.

अशा व्यक्तिला दोन्ही पदांसाठी जनादेश मिळालेला असतो. म्हणूनच सदस्यांमधून अध्यक्ष म्हणून निवडून आलेली व्यक्ती सदस्य राहते आणि त्याचबरोबर अध्यक्ष व सदस्य म्हणूनही काम करते.

# ठाकरे बंधू म्हणजे मुंबई किंवा मराठी नाही:अस्तित्व टिकवण्यासाठी दोन पक्ष एकत्र आलेत, युतीचा परिणाम होणार नाही - मुख्यमंत्री फडणवीस

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई- उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीची अधिकृत घोषणा झाल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या युतीचा समाचार घेतला आहे. "काही प्रसारमाध्यमे हे दृश्य असे दाखवत आहेत की जणू रशिया आणि युक्रेनची युती होत आहे. एकीकडून पुतीन आणि दुसरीकडून झेलेन्स्की निघाले आहेत, असे चित्र उभे केले जात आहे. मात्र, ही युती केवळ स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी दोन पक्ष एकत्र आलेले आहेत. ठाकरे बंधू म्हणजे मुंबई किंवा मराठी नाही," अशा शब्दांत फडणवीस यांनी राज-उद्धव यांच्या युतीची खिल्ली उडवली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "ठाकरे बंधू एकत्र आले याचा मला आनंदच आहे. पण ते एकत्र आल्याने राजकीयदृष्ट्या फार काहीतरी घडेल असा जर कुणाचा समज असेल तर तो बाळबोध समज आहे. कुठल्याही एका पक्षाला निवडणुकीत आपले अस्तित्व टिकवण्यासाठी जे काही करावे लागते, त्या दृष्टीने दोन अस्तित्वहीन पक्षांनी केलेली ही युती आहे. या पलीकडे याचा कोणताही अन्वयार्थ काढण्याचे कारण नाही. या युतीने महायुतीवर कोणताही परिणाम होणार नाही," असे फडणवीस म्हणालेत.

फडणवीस म्हणाले, ठाकरे बंधुंच्या युतीने फार काही परिणाम होईल, असे देखील मला वाटत नाही. ज्याप्रकारे मुंबईकरांचा विश्वासघात या मंडळींना सातत्याने केलाय. मराठी माणसाला मुंबईच्या बाहेर घालवण्याचे काम आणि पाप यांनी केलेल आहे. त्यामुळे मराठी माणुसही यांच्यासोबत नाही. ज्याप्रकारे अमराठी माणसावर सातत्याने हल्ले केलेत, ते देखील त्यांच्यासोबत नाहीत. मुंबईमध्ये कोणीही ठाकरे बंधुंच्या सोबत येणार नाहीत. यांचा ट्रॅक रेकॉर्ड केवळ भ्रष्टाचाराचा, स्वहिताचा आहे. निवडणुका आल्यावर भाविनक बोलायचे, पण आता भावनिक बोलण्याला जनता भुलणारी नाही.ठाकरे बंधूंनी अजून दोन-चार पक्ष सोबत घेतले तरी मुंबईकर महायुतीच्या पाठीशी उभे राहतील, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. "मुंबईकरांनी महायुतीचा विकास पाहिलेला आहे. विशेषतः मराठी



माणसाला मुंबईतच हक्काची घरे देण्याचा कार्यक्रम महायुतीने हाती घेतला आहे. त्यामुळे मुंबईची जनता विकासाच्या मुद्द्यावर महायुतीलाच कौल देईल," असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे म्हणजे मुंबई नाहीत, मराठी नाहीत. आपण म्हणजे सर्व काही असल्याचा त्यांचा गर्व आणि दुराभिमानामुळे मुंबईकर त्यांच्यापासून दूर गेलेत. कारण मुंबईकरांना सेवेकरी हवे आहेत. राज्य गाजवणारे आणि स्वतःचा फायदा पाहणारे नको आहेत. ठाकरे बंधुंची युती म्हणजे प्रीतिसंगम नाही, तर भीतीसंगम आहे, असेही फडणवीस म्हणालेत.

उद्धव ठाकरे विकासावर बोलले तर १ हजार रुपये मी देईन, अशी घोषणा मी मागच्या वेळेस केली होती. पण अजून माझे हजार रुपये वाचलेत. उद्धव ठाकरे विकासाची एकही गोष्ट बोलत नाहीत. आताची निवडणूक मुंबईच्या विकासाची आणि मुंबईकरांच्या हिताची आहे. त्यावर ते एक शब्द बोलत नाहीत, कारण ते बोलू शकत नाहीत. त्यांना २५ वर्षांचा हिशोब द्यावा लागेल. मिठी नदी, मराठी माणसाच्या घरांचा हिशोब द्यावा लागेल आणि तो हिशोब ते देऊ शकत नाही, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर केली.

## महत्त्वाचे...

### टी एम अकॅडमी अँड ब्युटी पॅलेस प्रस्तुत करा



नागपूर : टी एम एस अकॅडमी अँड ब्युटी पॅलेस च्यावतीने कराओके सिंगिंग प्रतियोगिता अँड कॅलेंडर लॉन्चिंग - 2026 च्या कार्यक्रमाचे आयोजन के पी हॉटेल अजनी येथे आयोजित करण्यात आले होते. कराओके सिंगिंग प्रतियोगितेत फर्स्ट विनर स्वरा माथुरकर तर सेंकड विनर हेमलता सलामे आणि थर्ड विनर सचिन शर्मा यांनी बाजी मारली. त्यावेळी या प्रतियोगितेत ज्यांनी भाग घेतला त्यांच्यासाठी बक्षीस वितरण ठेवण्यात आले होते. आणि सन्मानचिन्ह देऊन प्रमाणपत्राचे वाटपही केले. सर्वप्रथम पाहिले बक्षीस ५ हजार रुपये, दुसरे बक्षीस २ हजार, आणि तिसरे बक्षीस १ हजार रुपये रोख देण्यात आले. आंतरराष्ट्रीय कलाकार व पार्श्वगायिका सेलिब्रिटी पाहुणे म्हणून श्रुती जैन यांची यावेळी उपस्थिती होती. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी अनिल धकाते, शर्मिला कळंबे, अलिशा मोहम्मद, श्वेता वानखेडे, मोनिका नंदनवार, सुरेखा नवघरे, रश्मी तिरपुडे, नादियाँ हुसेन आणि शन्नो मस्करे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या दरम्यान जजेस म्हणून विशाखा पांडे आणि मीनल लाखे यांनी आपली कामगिरी बजावली. आयोजक तेजश्री उपाध्याय यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

### स्त्री मुक्ती परिषद व महिला सन्मान दिवस साजरा करणार!

नागपूर : भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दल व महिला मंडळातर्फे नागपूर शहरा च्यावतीने मनुस्मृति दहन दिनानिमित्त स्त्री मुक्ती परिषद व महिला सांस्कृतिक कार्यक्रम 25 डिसेंबर रोजी गुरुवारी टिळक पत्रकार भवन, दुसरा माळा, सभागृहात पंचशील चौक धंतोली येथे दुपारी 12 ते 4 यावेळेत मनुस्मृति दहन दिनानिमित महिला सन्मान दिवस साजरा करण्याचे ठरविले आहे. तरी सर्व नागपूरकर बंधू भगिनी तसेच संघटनेचे पदाधिकारी, सभासद कार्यकर्ते आणि शुभचिंतक यांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले जात आहे. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षा संगीताताई गोधनकर व प्रमुख पाहुणे म्हणून राहुल वानखेडे (विदर्भ संयोजक) कुशलभाऊ मेश्राम (प्रभारी), वनमालाताई उके माजी महिला शहर अध्यक्षा, पद्माकर गणवीर (समता सैनिक दल व भारतीय बौद्ध महासभा), संजना सुरजुसे (ओबीसी वक्त्या) पपिताताई खोब्रागडे (भारतीय बौद्ध म, अध्यक्ष नागपूर शहर) मंगेशभाऊ वानखेडे (शहर अध्यक्ष) संचालन वर्षाताई धारगावे, वंदनाताई पेटकर, हिंदू कोड बिल वाचन - नलिनी खांडेकर,ठराव वाचन प्रतिमाताई शेंडे, प्रस्तावना कांचनताई देवगडे, आभार प्रदर्शन शांताताई शेंडे, स्पेसल परफॉर्मन्स मध्ये महिलांचे नृत्य व गायन सादर केले जातील. निमंत्रक भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, महिला मंडळ नागपूर शहरातील वर्षाताई धारगावे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले.

### आज चिरव्हा येथे जनजागृतीवर भव्य सेवक संमेलन....

मौदा:- परमपूज्य परमात्मा एक सेवक मंडळ अंतर्गत उच्च प्राथमिक शाळा चिरव्हा येथे आज गुरुवारला (ता. २५) मानव धर्माचे संस्थापक व आमचे प्रेरणास्त्रोत महान त्यागी बाबा जुमदेवजी, मंडळाचे अध्यक्ष रवींद्र गायधने व उदघाटक संचालक तापेश्वर वैद्य यांच्या उपस्थित होत आहे.परमपूज्य परमात्मा एक सेवक मंडळ नागपूर अंतर्गत दु:खी कष्टी व अज्ञानी मानवास भगवत प्राप्तीचा व निष्कामभावनेने परिचय करून सुखमय जीवन जगण्यास प्रेरित करणारे, अंधश्रद्धा व वाईट व्यसनातून मुक्त करून सुखी जीवन जगण्याची प्रेरणा देणारे मानव धर्माचे संस्थापक व निष्काम कर्मयोगी "महानत्यागी बाबा जुमदेवजी"यांच्या शिकवणी प्रमाणे जनजागृती करीता भव्य सेवक संमेलन चिरव्हा येथे होत आहे.चिरव्हा मार्गदर्शक सुधाकरजी वंजारी यांच्या निवासस्थानी सकाळी ०७. ०० वाजता हवनकार्य, सकाळी ८. ३० ला शोभा यात्रा, भव्य संमेलनाचे उदघाटन व स्वागत दुपारी १२. ३० वाजता, चर्चा बैठक दुपारी १. ०० वाजता, स्नेहभोजन ०४.०० वाजता, सायंकाळी भजन व नाटक कार्यक्रम आयोजित केले आहे.

# दहा लाखांच्या सिमेंट रस्त्याच्या कामात भ्रष्टाचाराचा आरोप

## ग्रामपंचायत सावळीतील बांधकामाची उच्चस्तरीय चौकशीची मागणी










**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

पारशिवनी:पारशिवनी तालुक्यातील ग्रामपंचायत सावळी अंतर्गत क तीर्थक्षेत्र काबूल–कंधार पहाडी चिचोली येथे तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत सुमारे १० लाख रुपयांचे सिमेंट काँक्रीट रस्ता बांधकाम करण्यात आले असून, या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप उपसरपंच केतन सहारे यांनी केला आहे. या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, यासाठी २० डिसेंबर रोजी पत्रकार परिषद घेण्यात आली.

यावेळी बोलताना उपसरपंच केतन सहारे यांनी सांगितले की, सदर रस्ता बांधकाम जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत उपविभागीय अभियंता, जि. प. बांधकाम उपविभाग रामटेक यांच्या नियंत्रणाखाली सुमारे चार महिन्यांपूर्वी घाईघाईत पूर्ण करण्यात आले. काम सुरू होण्यापूर्वी ठेकेदार, ग्रामपंचायत सरपंच, सचिव धनराज गावंडे व जिल्हा परिषदेच्या शाखा अभियंत्याकडे इस्टीमेटची प्रत मागितली असता ती देण्यास टाळाटाळ करण्यात आली. प्रत्यक्षात काम पूर्ण झाल्यानंतर तब्बल चार महिन्यांनी ग्रामपंचायत सचिवांकडून इस्टीमेटची झेरॉक्स प्रत मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. इस्टीमेटनुसार रस्ता बांधकामासाठी बुडापासून खोदकाम करून ८० मिमी दगड व मुरूमाचा सहा इंच थर, त्यावर १:३:६ प्रमाणात चार इंच जाडीचा मास काँक्रीट व वरच्या स्तरावर १:०.७५:१.५ या प्रमाणात सहा इंच जाडीचा काँक्रीट स्लॅब करण्याची तरतूद होती. मात्र प्रत्यक्षात खोदकाम, दगड, मुरूम तसेच मास काँक्रीट न करता केवळ वरचा स्लॅब टाकण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच ठराविक प्रमाण न पाळता मनमानी पद्धतीने जास्त प्रमाणात वाळू वापरून अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आल्याचेही स्पष्ट करण्यात आले. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना नाली खोदून सहा इंच जाडीचे काँक्रीट दाखवण्यात आले असून मध्यभागी केवळ तीन इंच जाडी असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून येत असल्याचे सांगण्यात आले. यावरून ठेकेदार, सरपंच, ग्रामपंचायत सचिव तसेच जिल्हा परिषद बांधकाम विभागातील उपविभागीय अभियंता व शाखा अभियंता यांनी संगनमताने लाखो रुपयांचा अपहार केल्याचा आरोप उपसरपंच केतन सहारे यांनी केला. या संदर्भात ग्रामविकास मंत्री, पालकमंत्री, रामटेकचे आमदार तथा राज्यमंत्री आशिष जयस्वाल, जिल्हा परिषद नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अभियंता तसेच पारशिवनी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. मात्र अद्याप कोणतीही चौकशी सुरू न झाल्याने संबंधित वरिष्ठ अधिकारीच या भ्रष्टाचाराची पाठराखण करीत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

ग्रामपंचायत सचिवांवर गैरवर्तणुकीचे आरोप

दरम्यान, ग्रामपंचायत सावळीचे सचिव धनराज गावंडे यांच्यावरही गंभीर आरोप करण्यात आले आहेत. उपसरपंच केतन सहारे हे १५ डिसेंबर २०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज तसेच डिसेंबर २०२५ च्या ग्रामपंचायत मासिक सभेच्या विषयसूचीत विषय समाविष्ट करण्यासाठी अर्ज देण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात गेले असता, सचिव धनराज गावंडे व कर्मचारी कल्याणी पाटील यांनी अपमानास्पद वागणूक देत अर्ज स्वीकारण्यास नकार दिल्याचा आरोप करण्यात आला. पंचायत समिती पारशिवनीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे मोबाईलवर तक्रार केल्यानंतर त्यांच्या आदेशाने अर्ज स्वीकारण्यात आल्याचेही सांगण्यात आले. या प्रकारातून सरपंच व सचिव हे भ्रष्टाचारात सामील असल्याचे दिसून येत असून, एका जबाबदार पदाधिकारी असलेल्या उपसरपंचाशी अपमानास्पद व राजकीय भेदभावाची वागणूक देणे म्हणजे कर्तव्यात कसूर असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या दोन्ही प्रकरणांत तक्रार करूनही चौकशी न झाल्याने वरिष्ठ अधिकारीच पाठराखण करीत असल्याचा आरोप करण्यात आला.भ्रष्टाचार उघडकीस यावा व दोषींवर कठोर कारवाई व्हावी, यासाठी वर्तमानपत्रांच्या माध्यमातून आवाज उठवण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. येत्या दहा दिवसांत चौकशी सुरू न झाल्यास जिल्हा परिषद कार्यालयावर मोर्चा काढून त्यानंतर आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबण्यात येईल, असा इशारा उपसरपंच, सदस्य व ग्रामस्थांनी दिला. दरम्यान, चौकशीस होत असलेल्या विलंबामुळे उपसरपंच केतन सहारे यांनी आझाद पक्षाकडे पाठपुरावा केल्याने, या आंदोलनाला आझाद पक्षाने जाहीर पाठिंबा दिला असून आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी उपसरपंच केतन सहारे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य ममता चौरिवार, जयवंती धुर्वे, माया रंगारी, सागर धुर्वे, कुणाल गजभिये, अजय चौरिवार, प्रज्वल टाले, संजय चौरिवार, शुभम पटेल, अल्केश वाहणे, दिवांशु बगले, संदीप मेश्राम, भूषण सोनकुवर, सचिन मेश्राम, सुरेश थुल, संघरत्न गेडाम, विनोद रंगारी, दिलीप बडवाईक, यादव रंगारी, शेख मोहीम्मुद यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

# आसमान फाउंडेशन तर्फे वर्धा स्थित कुष्ठरोगी, मूक-बधिर व निराधार मुलांना ब्लैंकेट वाटप

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिध**



नागपूर : नागपुरातील आसमान फाउंडेशनच्या वतीने वर्धा येथे दिवसेंदिवस वाढत्या थंडीमुळे वर्धा येथील आसमान फाउंडेशन तर्फे वर्धास्थित निरंतर गोर गरीबांना ब्लैंकेट व निराधार मुलांना स्वेटर वाटप करीत आहे. यानुसार वर्धा येथील दत्तपुर में कुष्ठरोग रुग्णालय व पुनर्वसन केंद्रांतील कुष्ठरोगींना व आसमंत स्नेहालयातील निराधार वरिष्ठ नागरिक व मुलांना ब्लैंकेट वितरीत केले गेले. तसेच श्रीछाया बालगृहातील मूक-बधीर मुलांना कोल्ड क्रीम, मिठाईचे वाटप केले गेले. याप्रसंगी अध्यक्ष डॉ.रवि गिऱ्हे आसमान फाउंडेशन, सचिव नरेश शेंडे, अखई पटेल, वर्धा शाखा प्रभारी श्याम चंद्रा, आसमान महिला क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षा मेघा गिऱ्हे, दिनेश टेकाडे, निलेशजी व वर्धा स्थित सदस्य उपस्थित होते. वर्धा फाउंडेशनच्या शाखेतर्फे निरंतर जिल्ह्यातील गरीब, निराधार मुलांना, महिलांना व वरिष्ठ नागरिकांना जनसहयोगतून सहयोग केला जातो. असे डॉ. रवि गिऱ्हे यांनी सांगितले.

आसमान फाउंडेशन द्वारा वर्धास्थित कुष्ठरोगियों, मूक-बधिर व निराधार बच्चों को ब्लैंकेट वितरित -

ठिठुरती सर्दी में आसमान फाउंडेशन द्वारा गरीब व जरूरतमंदों को निरंतर ब्लैंकेट व बच्चों को स्वेटर वितरित किए जा रहे हैं। इसी शृंखला में वर्धा स्थित दत्तपुर में कुष्ठरोग रुग्णालय व पुनर्वसन केंद्र के कुष्ठरोगियों को एवं आसमंत स्नेहालय के निराधार वरिष्ठ नागरिकों को ब्लैंकेट वितरित किए गये। साथ ही श्रीछाया बालगृह स्थित मूक-बधिर बच्चों को कोल्ड क्रीम, मिठाई वितरित की गई। इस अवसर पर डॉ. रवि गिरहे अध्यक्ष आसमान फाउंडेशन, सचिव नरेश शेंडे, अखई पटेलजी, वर्धा शाखा प्रभारी श्याम चंद्रा, आसमान महिला क्रेडिट सोसायटी की अध्यक्षा मेघा गिरहें, दिनेश टेकाडे, निलेशजी व वर्धा स्थित सदस्य उपस्थित थे । फाउंडेशन की वर्धा शाखा द्वारा निरंतर जिले में गरीब, निराधार बच्चों, महिलाओं व वरिष्ठ नागरिकों को जनसहयोग से सहायता प्रदान की जाती है।




# आरपीजी फाउंडेशनतर्फे जुनेवणी येथे राष्ट्रीय शेतकरी दिवस साजरा

## सेंद्रिय शेतीचे महत्त्व शेतकऱ्यांना पटवून दिले

**दिव्य वतन /वृत्तसेवा**



काटोल: आरपीजी फाउंडेशनच्या वतीने काटोल तालुक्यातील जुनेवणी येथे नुकताच राष्ट्रीय शेतकरी दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांना राष्ट्रीय शेतकरी दिवसाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले तसेच सेंद्रिय शेतीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमात सेंद्रिय शेती ही आर्थिकदृष्ट्या कशी फायदेशीर आहे तसेच पर्यावरणाच्या दृष्टीने ती किती उपयुक्त ठरते, याबाबत उपस्थित शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली. रासायनिक खतांचा वापर कमी करून नैसर्गिक पद्धतीने शेती केल्यास मातीची सुपीकता वाढते, उत्पादन खर्चात बचत होते आणि आरोग्यदायी शेती शक्य होते, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

या कार्यक्रमाला विक्रम जाधव (प्रोग्राम मॅनेजर), प्रफुल घोळसे (प्रोजेक्ट ऑफिसर) यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच नीळकंठ गजभिये, हरिभाऊ ढोके, उमराव पाटील, संजय कौर, राजेंद्र बागडे, भागवत सहारे, प्रभाकर परतेती, ओंकार येवले, महादेव आरोडिया, मनीष येवले, रातीराम कौरती, विजय येवले, मुकुंदा चिंचोरिया यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळण्याचा निर्धार व्यक्त केला.

# आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात 'खरी कमाई'; उपक्रम उत्साहात साजरा

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

आमगाव येथील आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात आज मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर २०२५ रोजी स्काऊट-गाईड विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांतर्गत 'खरी कमाई (आनंद मेळा)' हा उपक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डी. एम. राऊत यांनी भूषविले, तर उद्घाटन सेवानिवृत्त शिक्षक श्री. श्रीकृष्ण चंदिवाले यांच्या हस्ते करण्यात आले.

**कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी उपमुख्याध्यापक डी. बी. मेश्राम, पर्यवेक्षक उमेश मेंढे, क्रीडा विभागातील ललित पटले व सौ. ललिता मानकर यांनी विशेष सहकार्य केले. तसेच श्री. बागडे सर यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उपक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.**

**राधाकिसन चुटे** जिल्हा प्रतिनिधी गोंदिया

या उपक्रमात इयत्ता नववीतील स्काऊट-गाईडचे एकूण ८३ विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी स्वउद्यमशीलतेचा अनुभव घेण्यासाठी २५ खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारले होते. प्रत्येक स्टॉलवर विविध प्रकारचे चविष्ट खाद्यपदार्थ ठेवण्यात आले होते.या आनंद मेळ्याचा लाभ घेत आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील सुमारे २००० विद्यार्थ्यांनी स्टॉलला भेट देत खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी २५ हजार रुपयांहून अधिक आर्थिक उलाढाल साध्य केली, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशीलतेचे धडे मिळाले.

# विनोद कुमार शुक्ल की साहित्य सम्पदा प्रेरणास्त्रोत - प्रो. कुमुद शर्मा; *हिंदी विवि ने शुक्ल को दी श्रद्धांजलि*

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

वर्धा-: महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय में वरिष्ठ साहित्यकार श्री विनोद कुमार शुक्ल को श्रद्धांजलि अर्पित करते हुए कुलपति प्रो. कुमुद शर्मा ने कहा कि शुक्ल का निधन साहित्य जगत के लिए दुखदायी घटना है। अनवरत लिखने वाले लेखक की कलम अचानक थम गयी है। वे हम सब के बीच शब्दों के माध्यम से जीवित रहेंगे। उनकी साहित्य सम्पदा सभी के लिए प्रेरणास्त्रोत है। विश्वविद्यालय की ओर से बुधवार, 24 दिसंबर को शुक्ल को ऑनलाइन माध्यम से श्रद्धांजलि दी गयी। इस अवसर पर दो मिनट का मौन रख कर उनके परिवार को आत्मिक बल एवं शक्ति प्रदान करने की कामना की गयी।

विदित है की हिंदी साहित्य के शिखर पुरुष विनोद कुमार शुक्ल (88) लंबे समय से अस्वस्थ थे। उन्होंने मंगलवार, 23 दिसंबर को एम्स, रायपुर में अंतिम सांस ली। 21 नवंबर को ही उन्हें साहित्य के सर्वोच्च सम्मान 'ज्ञानपीठ पुरस्कार' से नवाजा गया था। छत्तीसगढ़ के राजनांदगांव में 01 जनवरी 1937 को जन्मे शुक्ल हिंदी साहित्य की उस दुर्लभ विधा के लेखक थे, जो बिना शोर किए बहुत दूर तक सुनाई देती है। उनकी रचनाएं जीवन के साधारण क्षणों में असाधारण अर्थ खोज लेती थी।'लगभग जय हिन्द' उनका पहला कविता संग्रह 1971 मे प्रकाशित हुआ।

उनकी रचनाएं 'वह आदमी चला गया नया गरम कोट पहिनकर विचार की तरह', 'सब कुछ होना बचा रहेगा', 'कविता से लंबी कविता', 'आकाश धरती को खटखटाता है' जैसी कृतियां हिंदी कविता की दिशा बदलने वाले मील के पत्थर बनीं। गद्य में भी उनकी उपस्थिति उतनी ही प्रभावशाली रही। 1979 में आया उपन्यास 'नौकर की कमीज', जिस पर मणि कौल ने फिल्म बनाई, हिंदी उपन्यास की भाषा और दृष्टि को नई जमीन देता है। 'खिलेगा तो देखेंगे', 'दीवार में एक खिड़की रहती थी', 'एक चुप्पी जगह' जैसे उपन्यासों और 'पेड़ पर कमरा', 'महाविद्यालय', 'घोड़ा और अन्य कहानियां' जैसे कहानी संग्रहों ने उन्हें साहित्य का अनिवार्य नाम बना दिया। उनकी रचनाएं कई भारतीय और विदेशी भाषाओं में अनूदित हुई हैं। विनोद कुमार शुक्ल को साहित्य अकादमिक पुरस्कार, गजानन माधव मुक्तिबोध फेलोशिप, रजा पुरस्कार, शिखर सम्मान, राष्ट्रीय मैथिलीशरण गुप्त सम्मान, दयावती मोदी कवी शेखर सम्मान, हिंदी गौरव सम्मान और 2023 में पैन-नाबोकोव जैसे पुरस्कारों से भी सम्मानित किया गया।

# मौदा येथे राष्ट्रीय ग्राहक दिन उत्साहात साजरा

## ग्राहक चळवळीला जनआंदोलनाचे स्वरूप द्या : तहसीलदार निंबाळकर यांचे आवाहन



**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

मौदा. : येतील तहसील अन्नपुरवठा विभाग व अखिल भारतीय ग्राहक पंचांच्या वतीने ग्राहक हक्कांची जागृती व्हावी यासाठी दि.२४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय ग्राहक दिन मौदा तहसीलमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार दत्तात्रय निंबाळकर होते. त्यांनी मार्गदर्शन करताना ग्राहक चळवळ एका दिवसापुरती मर्यादित न ठेवता सतत चालू असलेल्या जनआंदोलनात रूपांतरित करण्याचे आवाहन केले.

"ग्राहक दिवस साजरा करून थांबू नका, चळवळीत रूपांतर करा" असे प्रेरणादायी उद्गार तहसीलदार निंबाळकर यांनी काढले. त्यांनी ग्राहकांचे मूलभूत हक्क आणि कर्तव्ये स्पष्ट करताना सुरक्षा, माहिती, निवड, ऐकले जाणे, नुकसानभरपाई आणि शिक्षण असे सहा मूलभूत हक्क असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार योगीता दराडे, अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे अध्यक्ष दिनेश ढोबळे, उपाध्यक्ष दिगांबर बांगडकर, महिला प्रमुख शीला तुरनकर, मार्गदर्शक डॉ. निलिमा घाटोळे, रेशमा निकम, मनीष काळे, रेशन दुकान संघटनेचे अध्यक्ष अशोक वासनिक आणि तुकाराम लुटे आदिंनी ग्राहक जागृतीबाबत मौल्यवान मार्गदर्शन केले. यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे पदाधिकारी, कार्यकर्ते, तहसीलमधील अन्न पुरवठा विभागाचे अधिकारी-कर्मचारी तसेच तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अन्न पुरवठा निरीक्षक शालिनी बारस्कर यांनी केले, तर आभार अमोल देशपांडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीराम तिजारे, प्रशांत उमरडकर आणि आरती मस्के यांचे विशेष सहकार्य लाभले. हा कार्यक्रम ग्राहक हक्क जागृतीचा प्रभावी व्यासपीठ ठरला असून, मौदा तालुक्यात ग्राहक चळवळीला आणखी बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# महायुती सरकारने संपूर्ण कर्जमाफी देवुन बळीराजाचा सन्मान वाढवावा-माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा

## राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त सानंदांनी बांधावर जाऊन शेतकरी बांधवांचा शेला,टोपी व पुष्पहार घालुन केला सत्कार.





**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

खामगाव :- वाढता उत्पादन खर्च आणि अपुरे उत्पन्न, कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ या सारख्या अस्मानी आणि सुल्तानी संकटामुळे महाराष्ट्र राज्यातील शेतकरी अडचणीत सापडला आहे. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे,शेतकरी सुखी तर जग सुखी या उक्तीप्रमाणे जर बळीराजाला सुखी,समृध्द करायचे असेल तर राज्यातील महायुती सरकारने 2024 च्या विधानसभा निवडणुकीमध्ये बळीराजाला संपुर्ण कर्जमाफी देण्याचे जे आश्वासन दिले होते ते आश्वासन तातडीने पुर्ण करुन बळीराजाला संपुर्ण कर्जमाफी देवुन त्यांचा सन्मान वाढवावा अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी केली.मंगळवार दि.23 डिसेंबर 2025 रोजी राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी तालुक्यातील वरणा या गावाला भेट देवुन शेतकरी बांधावर जावुन शेतकऱ्यांचा सत्कार,सन्मान केला त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे खामगाव तालुकाध्यक्ष मनोज वानखडे,खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विलाससिंग इंगळे,खरेदी विक्री संघाचे संचालक राजेंद्रसिंग इंगळे,कदमापूरचे माजी सरपंच पवन पवार यांच्यासह आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना राणा दिलीपकुमार सानंदा म्हणाले की, भारत हा कृषी प्रधान देश असुन देशातील बहुसंख्य लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे.शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. याच भुमिकेची आठवण करुन देण्यासाठी दरवर्षी 23 डिसेंबर रोजी राष्ट्रीय शेतकरी दिन साजरा केला जातो. या दिवशी शेतकऱ्यांचा सन्मान करुन त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आहे.शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होण्ो हे प्रत्येक जनप्रतिनिधीचे कर्तव्य असुन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार साहेब हे सदैव शेतकरी हितासाठी कटिबद्ध आहे असे सांगुन त्यांनी शेतकरी बांधवांना राष्ट्रीय शेतकरी दिनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी वरणा गावातील शेतकरी बांधावर जाऊन शेतकरी बांधवांसोबत आपुलकीने संवाद साधला. तसेच याप्रसंगी मधुकररावकाका पाघृत, डोलारखेडचे माजी सरपंच महादेवराव देठे, डॉ.लक्ष्मणराव पवार,वरणा येथील शेतकरी उमरावसिंग इंगळे,पांडुरंग इंगळे,गुलाबसिंग इंगळे, रतनसिंग इंगळे,अर्जुन वावगे,भगवानसिंग इंगळे,राजेंद्रसिंग इंगळे,गणेश इंगळे,शेषरावसिंग इंगळे, नरेंद्रसिंग इंगळे,संजयसिंग इंगळे या शेतकरी बांधवांचा शेला,टोपी देवुन व पुष्पहार घालुन सत्कार केला व पेढा भरवुन त्यांचे तोंड सुध्दा गोड केले.तसेच शेतकऱ्यांचा मित्र असलेला वृषभ राजाचे सुध्दा पुजन करुन उपस्थितांना राष्ट्रीय शेतकरी दिनाच्या शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी शेतकऱ्यांच्या आग्रहास्तव शेतकरी बांधवांसोबत ठेचा-भाकरचा आस्वाद घेतला. यावेळी उपस्थित असंख्य शेतकरी बांधवांनी शेतकरी सुखी तर जग सुखी,शेतकऱ्यांना संपुर्ण कर्जमाफी मिळालीच पाहिजे, शेतमालाला योग्य भाव मिळालाच पाहिजे-मिळालाच पाहिजे, राष्ट्रीय शेतकरी दिन चिरायु हो, शेतकरी एकजुटीचा विजय असो, एकच वादा-अजित दादा, अजितदादा पवार साहेब तुम आगे बढो-हम तुम्हारे साथ है अश्या घोषणा दिल्या. यावेळी जगतसिंग इंगळे,जगदिश इंगळे,गजेंद्रसिंग इंगळे,गोपालसिंग इंगळे,बंडु नाना,संतोषसिंग तोमर,प्रतापसिंग इंगळे,प्रमोदसिंग इंगळे,मुकुंदसिंग इंगळे,अमोल इंगळे,पवनसिंग इंगळे,जितेंद्रसिंग इंगळे,शुभम इंगळे,गजानन इंगळे,प्रतीक इंगळे, पवन इंगळे,प्रतापसिंग इंगळे,मुकेश इंगळे यांच्यासह वरणा येथील शेतकरी बांधव व युवक मोठया संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री पंचायतराज अभियानांतर्गत खातखेड ग्रामपंचायतीत गाव स्वच्छता अभियान

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

खातखेड — राज्य शासनाच्या मुख्यमंत्री पंचायतराज अभियान अंतर्गत आज खातखेड ग्रामपंचायत हद्दीत व्यापक स्वरूपात गाव स्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्वच्छ, आरोग्यदायी व सुंदर गाव या संकल्पनेतून आयोजित या अभियानास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या अभियानाचे नेतृत्व ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. शीतल रामेश्वर थारकर यांनी केले. मार्गदर्शनाखाली ग्रामसेवक सुषमा सावरकर यांच्या सहकार्याने संपूर्ण गावात स्वच्छतेची मोहीम राबविण्यात आली. यावेळी सार्वजनिक रस्ते, नाल्या,




अंगणवाडी परिसर, सार्वजनिक ठिकाणे व रहिवासी भागातील कचरा साफसफाई करून परिसर स्वच्छ करण्यात आला. अभियानात अंगणवाडी सेविका सौ. वंदना इलामे, गयाबाई बोरसे, सीआरपी यमुना थारकर, तसेच सौ. सुनंदा कळसकार, सौ. गोदावरी कळसकर, सायाबाई इलामे, सौ. उर्मिला थारकर, सौ. दुर्गा थारकर, सौ. सावित्रीबाई इलामे, सौ. शोभाबाई थारकर, सौ. वनिताबाई, सौ. मीनाक्षी इलामे, सौ. रेणुका इलामे, सौ. कल्पना थारकर यांच्यासह महिला मंडळाच्या सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. यावेळी सरपंच सौ. शीतल थारकर यांनी ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत, "स्वच्छता ही केवळ अभियानापुरती मर्यादित न राहता ती आपली दैनंदिन सवय व्हावी," असे आवाहन केले. ओला-सुका कचरा वेगळा करणे, प्लास्टिक वापर टाळणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे याबाबत जनजागृती करण्यात आली. अभियानामुळे गावाचा परिसर स्वच्छ व प्रसन्न झाला असून ग्रामपंचायत स्तरावर नियमित स्वच्छता मोहिमा राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे खातखेड गाव स्वच्छ व सुदृढ होण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकल्याचे चित्र दिसून आले.

# वसाडी प्राथमिक आरोग्य केंद्र प्रकरणाची चौकशी पूर्ण

## औषध विल्हेवाटीत त्रुटी आढळल्याने संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

बुलढाणा : प्राथमिक आरोग्य केंद्र वसाडी येथे मुदतबाह्य नसलेली औषधे जाळल्याचे तसेच वैद्यकीय अधिकारी अनुपस्थिती प्रकरणी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार प्रत्यक्ष भेट देऊन सखोल व वस्तुनिष्ठ चौकशी करण्यात आली. या प्रकरणी संबंधित तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व औषध निर्माण अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी दिली.

प्राथमिक आरोग्य केंद्र वसाडी येथे मुदतबाह्य नसलेली औषधे जाळण्यात आल्याचा तसेच वैद्यकीय अधिकारी अनुपस्थित असल्याचा आरोप करणारी बातमी प्रसारित झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार दिनांक 18 डिसेंबर 2025 रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र वसाडी येथे भेट देऊन सखोल व वस्तुनिष्ठ चौकशी करण्यात आली. चौकशीत असे आढळून आले की, प्राथमिक आरोग्य केंद्र वसाडी हे मार्च 2024 पासून कार्यरत असून मंजूर 15 पदांपैकी 2 वैद्यकीय अधिकारी कंत्राटी स्वरूपात कार्यरत आहेत व 8 पदे बाह्य स्त्रोताद्वारे भरलेली आहेत. काही पदे सध्या रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी सोनाळा येथे वास्तव्यास असून वसाडी येथे निवासाची सुविधा उपलब्ध नाही. ई-औषधी लॉगिन उपलब्ध नसल्यामुळे औषध पुरवठा प्राथमिक आरोग्य केंद्र सोनाळा येथून ऑफलाईन पद्धतीने करण्यात येत आहे. एप्रिल ते डिसेंबर 2025 या कालावधीत एकूण 5,417 बाह्यरुग्णांनी उपचार घेतले आहेत. चौकशीदरम्यान Calcium गोळ्या, Dexamethasone, Pheniramine, Gentamycin इंजेक्शन तसेच Metronidazole सिरप ही औषधे जाळण्यात आल्याचे निदर्शनास आले. सदर औषधांची एकूण किंमत 2 हजार 532 रुपये असून त्यापैकी फक्त 160 रुपये किंमतीची औषधे मुदतबाह्य होती. उर्वरित औषधांच्या विल्हेवाट प्रकरणी संबंधित औषध निर्माण अधिकाऱ्याकडून रक्कम वसूल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या प्रकरणी संबंधित तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व औषध निर्माण अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून प्राप्त खुलाशांच्या आधारे पुढील प्रशासकीय कारवाई प्रस्तावित आहे. भविष्यात अशा प्रकारची चूक आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

# आधुनिक संसाधनाच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत शासकीय सेवा पोहोचवा - जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

बुलढाणा: आजच्या युगात कृत्रिम बुद्धीमत्ता, समाजमाध्यमांसारख्या आधुनिक संसाधनांचा प्रभावी वापर सुरु आहे. या आधुनिक संसाधनाच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या योजना, उपक्रम आणि सेवा नागरिकांपर्यंत पोहोचवा, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिले. बुलढाणा जिल्ह्यात १९ ते २५ डिसेंबर या कालावधीत सुशासन सप्ताह राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विविध विभागांची कार्यशाळा मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यशाळेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, मुख्य वनसंरक्षक सरोज गवस, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड व इतर विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, आपल्या विभागाच्या प्रशासकीय कामकाजात अमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी आत्मनिर्भर होवून सकारात्मक दृष्टीकोण बाळगणे गरजेचे आहे. तसेच कामकाजात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, प्रभावीपणा, पारदर्शकता, कालबद्धता आणि कमी खर्चिक व सहज उपलब्ध होईल अशा कार्यपद्धतीचा अवलंब करावा.

नव्या बदलांचा स्वीकार करुन स्मार्ट काम करावे. संविधानानुसार शासकीय सेवांबाबत नागरिकांचा हक्क आहे. त्यामुळे प्रशासकीय कामकाजात सर्वसमावेशकता असली पाहिजे. यासोबतच नागरिकांच्या तक्रारी निकाली काढाव्यात, निरंतर शाश्वत विकासाच्या दृष्टीने काम करावे, अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी प्रशासनातील कामकाज पद्धतीविषयी मार्गदर्शन केले. प्रशासनात काम करतांना अधिकारी व कर्मचाऱ्यांनी चांगल्या भावनेने व सकारात्मक दृष्टीने काम करावे. नागरिकांप्रती मदतीची भावना ठेवा, आपण लोकांच्या सेवेसाठी आहोत यांची जाणीव ठेवून काम करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. या कार्यशाळेत उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी जिल्हा प्रशासनाने विकसित केलेल्या सहज प्रणाली, सुलभ सेवा चॅटबॉट, जिल्हा संकेतस्थळांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.




# जनसेवेचा आणि सुवर्ण यशाचा यथोचित सन्मान

## जिजाऊ मॉर्निंग फिटनेस क्लबतर्फे नवनिर्वाचित' सदस्यांचा भव्य सत्कार

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**



मलकापूर - आपल्या मलकापूर श हरात आरोग्य संपन्न समाजाची निर्मिती क रणाऱ्या येथील 'जिजाऊ मॉर्निंग फिटनेस क्लब' मलकापूर च्या वतीने नुकताच एक अभूतपूर्व गौरव सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यात लोकशाहीच्या उत्सवात विजयी झालेल्या नवनिर्वाचित नगरपरिषद सदस्यांचा आणि क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर तिरंगा फडकवणाऱ्या गुणवंत खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते मोठ्या थाटात सत्कार करण्यात आला मातृशक्ती आणि लोकसेवेचा गौरव न ग रपरिषद निवडणुकीत घवघवीत यश संपादन केल्याबद्दल क्लबचे सदस्य रा जुभाऊ पाटील, अनिलभाऊ गांधी यांच्यासह शिवराज जाधव यांच्या मातोश्री नव निर्वाचित सदस्या श्रीमती उर्मिलाताई जाधव तसेच डॉ गणेश पाचपांडे यांच्या सुन बा ई श्रीमती मीनाक्षी मोहन पाचपांडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. जिजाऊ मॉर्निंग फिटनेस"क्लबचा एखादा घटक जे व्हा जनसेवेसाठी निवडला जातो, तेव्हा तो संपूर्ण फिटनेस परिवाराचा सन्मान असतो, अशा भावना यावेळी व्यक्त झाल्या . क्री डा क्षेत्रातील सुवर्ण यश ६९ व्या शालेय राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत पदक पटकावून मलकापूरचे नाव दे शाच्या नकाशावर कोरणारे युवा खेळाडू सार्थक जोगदंड आणि श्रावणी जोगदंड यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला त्यांच्या या यशाने आगामी पिढीला नवी प्रेरणा मिळाल्याचे मान्यवरांनी सांगितले . उपस्थित मान्यवर: या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्रमोददादा अवसोलमोल व ऍड जी. डी. पाटील होते. त से च जिजाऊ फिटनेस क्लब चे श्री. विज य पळसकर, अजय जाधव साहेब यो गेश पाटील बाळासाहेब जगताप नितीन अहिरे महाराज, सुधाकर पाटील, संदीप जगदाळे, भगत साहेब, ऍड.निलेश तायडे, बाळू साबळे, अजय काकडे आणि गजानन जोगदंड बाळु साबळे चंद्रकांत साळुंके शंकर गवळे सर साहेब अविनाश नेमाने जनापभाई जितुभाऊ संचेती ज्ञानेश्वर तायडे संभारे मामा नाजूकराव देशमुख तसेच कार्यकमाचे सूत्रसंचालन चंद्रशेखर तायडे यांनी केले यांच्यासह क्लबचे सर्व सभासद उपस्थित होते.

# योगासन व सूर्यनमस्कार स्पर्धा उत्साहात

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

बुलडाणा बालवयात मुलांना योगासने व सूर्यनमस्कार करण्याची आवड निर्माण झाली तर त्यांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी ते पूरक ठरते.आजच्या स्पर्धेच्या काळात आरोग्यासह मुलांचं लक्ष एकाग्र करण्यासाठी सुद्धा योगशिक्षण महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव यांनी केले आहे. शहरातील जांभरुण रोडवरील संतुलन योग केंद्र व मृण्मयी मल्टिपर्पज सोसायटीच्या वतीने आयोजित योगासन व सूर्यनमस्कार स्पर्धा जागतिक ध्यान दिनी म्हणजेच २१ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आली होती.

त्यावेळी बक्षीस वितरणासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.ही स्पर्धा पाच वर्ष ते पंधरा वर्षांच्या मुलांसाठी आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेला बालकांनी उस्फूर्त प्रतिसाद देत ३० मुलांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. चिमुकल्यांनी केलेली विविध योगासने आणि सूर्यनमस्कार पाहून उपस्थित प्रेक्षक थक्क झाले होते. स्पर्धेची सुरुवात सियारा सुनील विधाते या चिमुकलीच्या प्रार्थनेने करण्यात आली.

स्पर्धेसाठी चिखली येथील योगशिक्षक नीलेश शिंगणे व बुलडाणा येथील योगशिक्षिका डॉ. तृप्ती काटेकर यांनी पंच म्हणून काम पाहिले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी क्षितिज गजेंद्र निकम व समर्थ विनोद भुसारी यांनी परिश्रम घेतले. बाल वयातच मुलांमध्ये योगासनांची व सूर्यनमस्काराची आवड निर्माण व्हावी, यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे संतुलन योग केंद्राच्या संचालिका डॉ. वैशाली गजेंद्र निकम यांनी सांगितले. योग स्पर्धेत सहभागी झालेली चिमुकले यांच्यासह उपस्थित असलेले प्रशिक्षक व मान्यवर.




## महत्त्वाचे...

### साडेपाच हजार हेक्टरवरील तुरीचे पिक धोक्यात

बुलडाणा: तालुक्यातील साडेपाच हजार हेक्टरवरील तुरीचे पीक वाळत असून, उत्पादन प्रचंड घटणार असल्याने शेतकरी हवालादिल झाला आहे. जिल्ह्यात यंदा जून महिन्याच्या प्रारंभी वरूणराजाने फारशी कृपा केली नाही. मृगनक्षत्रात पावसाने पाठ फिरवल्याने अनेकांची चिंता वाढली. मात्र जूनच्या अखेरीस दोन वेळा मुसळधार पाऊस झाला होता. जुलै महिन्यात मात्र पावसाने सरासरी गाठली नाही. ऑगस्ट महिन्यात कधी संततधार तर कधी जोरदार पाऊस पडत सप्टेंबरमध्ये पावसाने सरासरी ओलांडली. याचा परिणाम पिकांवर झाला.दरम्यान आता रब्बी हंगामातील पिकेही धोक्यात आल्याचे तेल्हारा तालुक्यातील शेतीवर नजर टाकल्यास दिसून येते.तेल्हारा तालुक्यात सुरुवातीला अतिवृष्टीमुळे सोयाबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले. शेतकऱ्यांची तूर पिकावर आशा असतांनाच गत काही दिवसांपासून शेतातील तूर पिक वाळत असल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. पिकाच्या रुपाने हाता तोंडांशी आलेला घास हिरावून घेतल्या जात आहे. गत आठवड्यापासून धुवारी पडत असल्याने शेतातील तूर पिक जोमदार असतांनाच सुकु लागल्याने फुलोर गळत आहे. शेतकरी पार खचून गेले आहे. तूर पिकावरील संकटाकडे कृषी विभागाने लक्ष देऊन उपाय योजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

### वसाडी प्राथमिक आरोग्य केंद्र प्रकरणाची चौकशी पूर्ण

बुलढाणा : प्राथमिक आरोग्य केंद्र वसाडी येथे मुदतबाह्य नसलेली औषधे जाळल्याचे तसेच वैद्यकीय अधिकारी अनुपस्थिती प्रकरणी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार प्रत्यक्ष भेट देऊन सखोल व वस्तुनिष्ठ चौकशी करण्यात आली. या प्रकरणी संबंधित तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व औषध निर्माण अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी दिली. प्राथमिक आरोग्य केंद्र वसाडी येथे मुदतबाह्य नसलेली औषधे जाळण्यात आल्याचा तसेच वैद्यकीय अधिकारी अनुपस्थित असल्याचा आरोप करणारी बातमी प्रसारित झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार दिनांक 18 डिसेंबर 2025 रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र वसाडी येथे भेट देऊन सखोल व वस्तुनिष्ठ चौकशी करण्यात आली. चौकशीत असे आढळून आले की, प्राथमिक आरोग्य केंद्र वसाडी हे मार्च 2024 पासून कार्यरत असून मंजूर 15 पदांपैकी 2 वैद्यकीय अधिकारी कंत्राटी स्वरूपात कार्यरत आहेत व 8 पदे बाह्य स्त्रोताद्वारे भरलेली आहेत. काही पदे सध्या रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी सोनाळा येथे वास्तव्यास असून वसाडी येथे निवासाची सुविधा उपलब्ध नाही. ई-औषधी लॉगिन उपलब्ध नसल्यामुळे औषध पुरवठा प्राथमिक आरोग्य केंद्र सोनाळा येथून ऑफलाईन पद्धतीने करण्यात येत आहे. एप्रिल ते डिसेंबर 2025 या कालावधीत एकूण 5,417 बाह्यरुग्णांनी उपचार घेतले आहेत. चौकशीदरम्यान Calcium गोळ्या, Dexamethasone, Pheniramine, Gentamycin इंजेक्शन तसेच Metronidazole सिरप ही औषधे जाळण्यात आल्याचे निदर्शनास आले. सदर औषधांची एकूण किंमत 2 हजार 532 रुपये असून त्यापैकी फक्त 160 रुपये किंमतीची औषधे मुदतबाह्य होती. उर्वरित औषधांच्या विल्हेवाट प्रकरणी संबंधित औषध निर्माण अधिकाऱ्याकडून रक्कम वसूल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या प्रकरणी संबंधित तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व औषध निर्माण अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून प्राप्त खुलाशांच्या आधारे पुढील प्रशासकीय कारवाई प्रस्तावित आहे. भविष्यात अशा प्रकारची चूक आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तसेच तालुकास्तरावरील नियंत्रणाबाबत वरिष्ठ स्तरावर आवश्यक ती कारवाई प्रस्तावित आहे.

## नेतृत्व, कर्तृत्व, वक्तृत्व यांचा सुरेख संगम अटलबिहारी वाजपेयी

कवी मनाचे, प्रखर राष्ट्रवादी अशी प्रतिमा असणारे भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची आज जयंती. २५ डिसेंबर १९२४ रोजी जन्मलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांनी कानपूरमधून राज्यशास्त्रात एम ए ची पदवी मिळवली. पदवी मिळविल्यानंतर वाजपेयी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करता करता त्यांनी पत्रकारिताही केली. राष्ट्रधर्म, पांचजन्य आणि वीर अर्जुन या नियतकालिकांसाठी त्यांनी पत्रकारिता केली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात भाग घेऊन त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ साली जनसंघांची स्थापना केली. जनसंघाच्या स्थापनेत श्यामाप्रसाद मूखर्जी इतकाच अटलबिहारी वाजपेयी यांचाही वाटा आहे. १९५७ साली पहिल्यांदा ते जनसंघाच्या तिकिटावर लोकसभेत पोहचले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी त्यांनी लोकसभेत ठसा उमटवला. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू आवर्जून लोकसभेत उपस्थित राहत. पंडित जवाहरलाल नेहरु अटलजींच्या वक्तृत्वाने मोहित झाले होते. अटलबिहारी वाजपेयी एकदिवस भारताचे पंतप्रधान बनतील असे भविष्य त्यांनी वर्तवले होते. अटलबिहारी वाजपेयी सलग ९ वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. १९६८ साली ते जनसंघाचे अध्यक्ष बनले. पक्षाध्यक्ष या नात्याने जनसंघ घरोघरी पोहचवण्याचे काम त्यांनी केले. त्याचवेळी विरोधी पक्षाची भूमिकाही त्यांनी तितक्याच प्रभावीपणे बजावली. १९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. या आणीबाणीला त्यांनी प्रखर विरोध केला. आणीबाणीला विरोध केला म्हणून त्यांना दोन वर्षाचा कारावास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर इंदिरा गांधी यांना पदावरुन हटवण्यासाठी सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला. अटलबिहारी वाजपेयी यांनीही आपला जनसंघ हा पक्ष जनता पार्टीमध्ये विलीन केला. पण अवघ्या तीन वर्षात १९८० साली त्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीची घोषणा केली. मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात अटलजी परराष्ट्रमंत्री होते. परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी इतर देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परराष्ट्रमंत्री म्हणून संयुक्त राष्ट्र संघात त्यांनी हिंदीतून भाषण केले. संयुक्त राष्ट्र संघात हिंदीतून भाषण करणारे ते पहिले नेते होते. १९९६ साली ते पहिल्यांदा पंतप्रधान बनले पण लोकसभेत बहुमत सिद्ध न करता आल्याने अवघ्या तेरा दिवसांतच त्यांचे सरकार पडले. त्यानंतर १९९८ साली ते पुन्हा पंतप्रधान बनले यावेळी मात्र त्यांचे सरकार तेरा महिने टिकले. पण या तेरा महिन्यात त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता त्यांनी अणुस्फोट करून आपले सामाजिक व वैज्ञानिक श्रेष्ठत्व सिद्ध केले. ते पंतप्रधान असतानाच भारताने कारगिल युद्ध जिंकले होते. जय जवान, जय किसान, जय विज्ञान ही घोषणा त्यांनी दिली. १९९९ साली तिसऱ्यांदा ते पंतप्रधान बनले. यावेळी मात्र त्यांचे सरकार पाच वर्ष टिकले. सलग पाच वर्ष पंतप्रधान राहिलेले ते पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान होते. अटलबिहारी वाजपेयी हे उत्कृष्ट कवी होते त्यांच्या सर्व कविता लोकप्रिय झाल्या त्यातील आओ फिरसे दिया जलाये.... ही कविता लोकांना खूप आवडली. त्यांनी सुमारे ४० पुस्तकांचे लेखन केले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार त्यांना अनेकवेळा मिळाला. सरकारने त्यांना पद्मविभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार त्यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व यांचा सुरेख संगम असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. अटलबिहारी वाजपेयी यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

# साहेब, बळीराजाच्या कष्टाची काय कदर करता हो ?

२३ डिसेंबर राष्ट्रीय शेतकरी दिवस म्हणून भारत देशभर साजरा होत आहे. एकीकडे भारत महासत्ता होणार असल्याचा आशावाद व्यक्त होतो. मात्र, दुसरीकडे देशातील शेतकरी हवालदिल झाला आहे. एकीकडे राष्ट्रीय शेतकरी दिन साजरा होतो, दुसरीकडे त्याच देशातील शेतकऱ्यांना त्याच्या शेती व्यवसायासाठी कुठलीही सुविधा मिळत नाही. दिवसेंदिवस शेतकरी आत्महत्या वाढतच आहेत. शेतकऱ्याला सन्मानाने बळीराजा म्हटले जाते; मात्र प्रत्यक्षात हा राजा अतिशय दीनदुबळा झालेला आहे. कर्जबाजारीपणा आणि आर्थिक विवंचना या आपत्तींचा बळी शेतकरी ठरलेला आहे. शासनासह समाजातील प्रत्येक घटकाने शेतकऱ्यांप्रती किमान कृतज्ञतेची भावना ठेवणे गरजेचे आहे.

हरितक्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त एक जून हा कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचा हवा तसा परिणाम शेतकऱ्यांच्या जीवनात झाल्याचे दिसून येत नाही. राज्यात पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांनी कृषीक्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल त्यांचा जन्मदिवस २९ ऑगस्ट शेतकरी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय आघाडी सरकारने घेतला होता. त्यासाठी त्यांचे नातू आणि तत्कालीन राज्य सरकारमधील कृषिमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पुढाकार घेतला होता. महिला शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्रालयाने २०१७ पासून १५ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय महिला शेतकरी दिन म्हणून साजरा करण्याचे ठरविले. त्याचीही अंमलबजावणी सुरू झालेली आहे. हे सर्व पाहून शासन-प्रशासनाला राज्यातील शेतकऱ्यांबाबत फारच कळवळा आहे, असे दिसून येते. एवढा कळवळा शेतकऱ्यांविषयी आहे, तर मग त्यांच्यावर नवीन नियम व कायदे बळजबरीने का लादले जातात? त्यांना आपल्या क्षुल्लक मागण्यांसाठी मोर्चे, आंदोलने, उपोषणे आदी मार्गांचा अवलंब वारंवार का करावा लागतो? आज फार मोठ्या आर्थिक, मानसिक विवंचनेतून हा शेतकरी जात आहे. कोणत्याही समस्येने बळीराजाला-शेतकऱ्याला ग्रासले असेल, तर त्याला मदतीचा हात नक्की दिला पाहिजे. ही जबाबदारी केवळ शासनाची नसून समाजातील प्रत्येक घटकाची आहे.

भारताचे पाचवे पंतप्रधान चौधरी चरणसिंग यांचा वाढदिवस २३ डिसेंबर हा राष्ट्रीय किसान दिन म्हणून साजरा केला जातो. देशातील शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी भरीव कामगिरी केली आहे. राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेची- नाबार्ड त्यांनीच स्थापना केली. दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये २००१ साली चौधरी चरणसिंह यांचा जन्मदिवस राष्ट्रीय शेतकरी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार तो आजही सुरू आहे. देशातील मंत्री, अधिकारी, उद्योजक, कर्मचारी, व्यापारी यांना शेतकऱ्यांबद्दल काहीच निष्ठा नाही, असे खेदाने म्हणावे लागत आहे. प्रशासनात अनेक शेतकऱ्यांची मुलं आहेत. त्यांनी बापाचे कष्ट जवळून पाहिले असतानाही त्याचा कैवार घेण्यास बहुतांश जण तयार होत नाहीत. नोकरदारवर्ग 'फिक्स रेट' सांगणाऱ्या व्यापाऱ्यांकडे भाव करत नाही. मात्र तो अन्नदात्याकडे शेतमाल व भाजीपाल्याचा भाव कमी करण्याचा आग्रह धरतो. व्यापारीसुद्धा ठोक व्यवहारात भाव कमी करण्यास भाग पाडतो व आपण मात्र चिल्लर विक्री म्हणून चढ्या दराने विकतो आणि शेतकऱ्यांनी कष्टाने पिकविलेल्या शेतीमालावर गडगंज पैसा कमावतो. म्हणूनच आज परत म्हणावसं वाटतंय, मातीतून सोन्याहून मोल्यवान असं अन्न उगवणारे तुम्ही, काळाच्या या ओघाला घाबरू नका! तुमच्या मनगटात ती धमक आहे, ज्याला घाबरून हा दुष्ट काळसुद्धा समोर उभारणार नाही. लढा, आत्तापर्यंत लढत आलात, तोच लढा चालू ठेवा. एक ना एक दिवस या जगाला तुमचे अस्तित्व मान्य करावेच लागेल. या निमित्ताने एवढंच सांगावंस वाटतंय, एक तास जेवायला उशीर झाला तर आपली काय अवस्था होते? जेवणात जर फक्त पाणीच मिळायला लागलं तर मग काय होईल? कल्पनाच करवत नाही! पण, आपले शेतकरी असेच मरत राहिले तर शेती उरणारच नाही. वेळीच उपाय, योग्य निर्णायक योजना, त्यांना मानसिक आधार, त्यांच्या मुलांना योग्य शिक्षण, या व अशा अनेक योजना राबवून या दुष्ट चक्रातून शेतकऱ्यांना वेळीच बाहेर काढावे लागेल. बळीराजाचं अस्तित्व नाकारलं, तर या जगातील समस्त मानवजातीचं अस्तित्व संपुष्टात येण्यास कितीसा वेळ लागेल? याचा विचार करा.

सगळ्यांनी अवती-भवती असणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांचा स्वाभिमान जराही न दुखावता, हवी तेवढीच आणि तितकीच मदत अगदी स्वेच्छेने केली पाहिजे. त्याच्या कष्टाची कदर झाली पाहिजे. त्याच्यासाठी असलेल्या सर्व शासकीय योजना; सोयी-सवलती निव्वळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्ष त्याच्या बांधापर्यंत पोचल्या पाहिजेत. अनेक बांधवांचे शिक्षण अपूर्ण असल्याने त्यांना शासनाच्या योजनांची माहिती होत नाही किंवा शासनाच्या योजनांचा लाभ कसा घ्यावा? हे त्यांना कळत नाही. समाजात कितीतरी शेतकरी आधुनिक आणि पारंपरिक शेतीत योग्य तो समन्वय साधून शेती करू शकत नाही. त्याला योग्य तो शेतीपूरक जोड-धंदा कसा करायचा? याबाबत माहिती आपण देऊ शकतो. शेतकऱ्यांना सुखी-समाधानी आणि तृप्त जीवन जगण्यास आपण त्यांना धीर देऊ शकतो. त्यामुळे या संदर्भात आपल्याला या व्याकूळ झालेल्या शेतकऱ्यांना या विषयी माहिती देऊन शक्य तेवढी मदत केली पाहिजे. चला तर मग आज राष्ट्रीय किसान दिनानिमित्त एक निर्धार करू आणि आज आपला शेतकरी ज्या परिस्थितीत जगतोय त्याला यातून आपल्या मदतीने बाहेर काढू. इडा पिडा टळो व बळीचे राज्य येवो, अशी मनोकामना उरी बाळगुया! भारताचे पाचवे पंतप्रधान चौधरी चरणसिंग यांचा जन्मदिवस २३ डिसेंबर हा राष्ट्रीय किसान दिन म्हणून साजरा केला जातो. देशातील शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी भरीव कामगिरी केली आहे. आज शेतकरी प्रचंड आर्थिक तणाग्रस्त अन् मानसिक विवंचनेत आहे. सततची अवकाळी स्थिती आणि नासधूस, दरवर्षीची नापिकी तसेच कर्जबाजारीपणा यामुळे शेतकरी राजा नाउमेद झाला आहे. चला तर, आजच्या दिनानिमित्त या परिस्थितीतून आपल्या अन्नदात्यास बाहेर काढण्याचा निर्धार आपण सर्वजण करुया!

!! राष्ट्रीय शेतकरी दिन चिरायू होवो !!

- संकलन व शब्दांकन -

श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.
(शेतकरीपुत्र व शेतीप्रश्नांचे गाढे अभ्यासक)
मु. जि. गडचिरोली, मोबा-७७७५०४१०८६.

# रेड्यावरचा देवदूत

आषाढ नंतर श्रावण महिन्याला आरंभ झाला,तशी पावसाने झड लावली.... अशातही आम्ही शाळकरी पोरं पिंपळखुटा-लोणार ही काट्याकुट्याची चिखलवाट तुडवत होतो . त्यादिवशी पोटभर चाराखाऊन टुम झालेल्या म्हशीच्या पोटासारखं काळंकुट्ट आभळ खाली लोंबकळत होतं. आधीच चेकाळलेला पाऊस सारखा कोसळत होता. अंबर तलावाच्या सोंडेला पाणी येईल, म्हणून आम्ही सरांकडून शाळा सुटण्याआधीच घरी जाण्याची परवानगी घेतली... श्रीमंतांच्या मुलांकडे ॲल्युमिनियम च्या पेट्या किंवा छान-छान दप्तरं असली तरी हायब्रीड ज्वारीच्या बियाण्याची पिशवी हेच आमचे दप्तर....त्यात वह्या -पुस्तकं भरली. कुणाकडेच छत्री नसल्याने कोंगतीनेच अंग झाकत पोरांनी घराकडे धूम ठोकली.गुडघाभर पाण्यातून धाररस्ता तुडवत आम्ही पंचायत समिती जवळ पोहोचलो. कोणी मोठा माणूस येईल याची वाट पाहूनही उपयोग झाला नाही.पावसाचा जोर वाढतच होता.लोणार शहरापासून चार कि.मी.अंतरावर असलेलं पिंपळखुटा गाव खूप दूर वाटू लागलं. पंचायत समितीच्या मागील चुनाभट्टीची खोंगळी भरून वाहत होती.ढगांच्या गडगडाटानं आसमंत कंपित होत होता. अधूनमधून विज शेलाटी सारखी सळसळून जात होती. पावसाचा अजूनही दम जिरला नव्हता. मोठ्या मारुतीचा रस्ता सोडून अंबर तलावाच्या रस्त्याला लागलो... लांबूनच तलावातील बेडूकांचा बेसूर आवाज कानाच्या पडद्यावर आदळला .... त्या भेसूर आवाजानं काळजात अधिकच धडकी भरत होती. मन घट्ट करून घर जवळ करणं भाग होतं.रामदास, अरूण, सत्यनारायण, प्रल्हाद,विजू, अशोक सह आम्ही दहा-बारा जण.... एकमेकांची साथ करत तळ्याची पाळू गाठली. तळ्यातला रस्ता तर अधिकच भेदरवणारा... डोक्यावरच्या कोंगत्या आवरत दप्तर सावरत पोरं पाण्याजवळून काठाकाठाने पुढे जात होती. तळ्याच्या सोंडेचे पाणी वरवर चढत होते. सोंडेच्या पाण्यातून वाहून जाण्याची भीती प्रत्येकाच्या मनात घर करत होती. चौताळलेलं भोरं पाणी त्यात भर घालत होतं. हाताला हात धरून कशीबशी तलावाची सोंड पार केली. लोण्यासारखा मऊ झालेला चिखल पायाला गुदगुल्या करत होता. मात्र मध्येच एखादा टोकदार खडा पायाखाली आला, तर जीव रसातळाला जात होता.शाळेसाठी दररोज करावी लागणारी पायपीट अंगवळणी पडली होती. निसर्गाने आज आमची परीक्षाच घेण्याचं ठरवलं होतं. रस्ता उरकत नव्हता;वाट चिखलात बुडाली होती. तळ्याच्या पाळू चा चढणीचा रस्ता कसाबसा पार केला. उतरणीचा रस्ता निसरडा झाल्याने पोरं रपारप आपटत होती. दप्तरातली पुस्तके सावरत पुन्हा उठून चिखलात बोटं रोवून चालत होती. दुथड्या भरून वाहणाऱ्या महारुखओढ्याने रौद्ररूप धारण केले होते. ओढ्याचं पाणी सर्व दूर शेतात पसरलं होतं. आईच्या पदराखाली दडवी, तशी सर्वच पोर महारुकाच्या खोडाला बिलगली... ओढ असलेल्या ओढ्याच्या पाण्याकडे पाहून डोळे गरगरत होते.रस्त्याने कोणी येते का? पोरं याची वाट पाहत होती. कोणी तरी हेल्यावर बसलेला माणूस तळ्याच्या पाळू वरुन खाली उतरताना दिसला; तसा सर्वांच्या जीवात जीव आला. वाट मागे सोडत हेला पुढे-पुढे सरकत होता. धो धो पडणारा पाऊस अन् चिखलाची वाट याचं त्याला काहीच वाटत नव्हतं. ओढ्याजवळ येताच पोरं हेल्या भोवती जमा झाली. रेड्यावर बसून आलेली व्यक्ती ओळखीचीच निघाली.... आमच्या गावाच्या पुढचं गाव कोयाळी दहातोंडे.... त्या गावचे ते गृहस्थ.... 'काका,आम्हाला ओढ्या पार करायला मदत करानं', अशी विनवणी आम्ही त्यांना केली. ते गृहस्थ राजी तर झाले; परंतु एका-एका पोराला ओढा पार करून देताना खूप वेळ लागणार होता. त्यातच दिवस मावळतीला झुकला होता. आभाळात काळ्याकुट्ट ढगांनी गर्दी केली होती.अंधाराने प्रकाश गिळून टाकला होता. पाऊस थांबला असला तरी ओढ्याचं पाणी होड लागल्यागत पळतच होतं; भोवर्‍याच्या ठिकाणी गोल गोल फिरत होतं. त्यामुळे ते अधिक भेसुर दिसत होतं. सर्वांना एकाच वेळी ओढ्या पलीकडे न्यायचे असा बेत त्या व्यक्तीने बोलून दाखवला. त्यांनी पोरांना हेल्याची शेपूट पकडायला सांगितले. अंगापिंडाने जरा बर्‍या असलेल्या आमच्यातील एकाने हेल्याची शेपूट पकडले. बाकीच्यांनी शेपूट पकडणार्‍यासह एकमेकांची कंबर घट्ट पकडली. तरीसुद्धा आमच्या मनात एक भीती होतीच ... जर रेड्यानं शेपूट धरणाऱ्याला लाथ मारली किंवा त्याच्या हाताची पकड ढिली झाली तर...... असे एक ना अनेक विचार आमच्या मनात येत होते.हेला ओढा पार करू लागला.कोणाच्या खांद्या इतकं तर कोणाच्या गळाभर पाण्यातून आम्ही पुढे सरकू लागलो.चालताना पाण्यातही आम्हाला घाम फुटला होता. त्यावेळी आमचा जीव शेपटी पकडणार्‍याच्या हातात होता. पाण्याला ओढ असल्याने पाय वर उचलल्या जायचे... प्रत्येकानं मनाचा हीय्या पक्का केला होता. हेल्यानं ओढा पार केला तसा शेपूट धरणारा सुद्धा ओढ्याच्या काठावर पोचला. तसे सर्वच ओरडले, 'हेलगटाची शेपूट सोडू नको रे....' सर्व पोरं ओढ्याच्या काठावर पोहोचले अन् त्यानं शेपूट सोडली.पाऊस मात्र आमची शेपूट सोडायला तयारच नव्हता; पुन्हा तो आभाळाचे पोट फुटल्यागत कोसळतच होता. हलगटावरच्या माणसानं रेड्याच्या ढुंगणावर फोगी मारली, तसा रेड्याने पांड धरला. पुस्तकं कोंगत्यात गुंडाळल्यामुळे कोणाच्याच अंगावर आता कोंगती उरली नव्हती. आम्ही सर्वच बेकाबू झालेल्या पावसात चिंब भिजलो होतो.चिखल तुडवत त्या रेड्यामागे पळत होतो.यमदूत रेड्यावर बसून येतो असे मी लहानपणी अनेकदा ऐकले होते. परंतु त्या दिवशी मी रेड्यावरचा देवदूत अनुभवला....

ज्ञानदेव मानवतकर
'ऋतुरंग' शिक्षक कॉलनी ,
डोणगाव रोड मेहकर
९०११७४४०३८

# साने गुरुजी:भारत जोडण्यास प्रयत्नशील!

_समाजातील जातिभेद, अस्पृश्यता यांसारख्या अनिष्ट रूढी व परंपरांना साने गुरुजींनी नेहमी विरोध केला. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळावा, यासाठी त्यांनी सन १९४६च्या दरम्यान महाराष्ट्राचा दौरा केला, या भूमिकेला त्यांनी महात्मा गांधींचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न केला, तो शेवटपर्यंत मिळाला नाही. अखेर साने गुरुजींनी या मुद्यावर उपोषणाचा मार्ग अवलंबला व त्यांना यश मिळाले. "एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला खऱ्या अर्थाने मुक्त केले", असे त्या वेळी म्हटले गेले. सदर माहितीपूर्ण लेख श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दशैलीतून जरूर वाचाच..

साने गुरुजी हे मराठीतले एक श्रेष्ठ गांधीवादी शिक्षक, स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक आणि प्रतिभावंत लेखक होते. त्यांचा जन्म कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड या गावी झाला. त्याठिकाणी त्यांचे वडील कोर्टाचे काम करीत असत. कोर्टाचे घराणे साधारणतः वैभवसंपन्न व श्रीमंत समजले जाते व त्यांच्या आजोबांच्या वेळची परिस्थिती तशी होतीही. पण त्यांच्या वडिलांच्या, सदाशिवरावांच्या वेळेपासून मात्र घराण्याची आर्थिक स्थिती घसरत गेली. ती इतकी की, सदाशिवरावांचे घरदारही जप्तीत नाहीसे झाले. अशा रितीने "बडा घर पण पोकळ वासा" झालेल्या या घराण्यात दि.२४ डिसेंबर १८९९ रोजी पांडुरंग सदाशिव सानेंचा जन्म झाला. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा फार मोठा प्रभाव पडला होता. त्यांच्या आईने त्यांच्या बालमनावर जे विविध संस्कार केले त्यातूनच साने गुरुजींचा जीवनविकास झाला. त्यानी इंग्रजी साहित्यामध्ये एमए. ही उच्च पदवी मिळवली होती.


"जो आवडतो सर्वांला।
तोचि आवडे देवाला।।"

शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथील प्रताप हायस्कूल येथे शिक्षक म्हणून सहा वर्षे- सन १९२४ ते १९३०पर्यंत नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वतःच्या उदाहरणातून स्वावलंबनाचे धडे दिले, सेवावृत्ती शिकवली. अंमळनेर येथील प्रताप तत्त्वज्ञान केंद्र येथे त्यांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यासही केला. इ.स. १९२८ साली त्यांनी "विद्यार्थी" हे मासिक सुरू केले. त्यांच्यावर महात्मा गांधींच्या विचारांचा फार मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत असत. इ.स.१९३० साली त्यांनी शिक्षकाची नोकरी सोडून सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. त्यांनी "काँग्रेस" नावाचे साप्ताहिक काढले. दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी व्हावी म्हणून प्रयत्न केले. जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथील काँग्रेस अधिवेशन-१९३६ यशस्वी होण्यासाठी त्यांनी खूप काम केले. इ.स.१९४२च्या चळवळीत भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार केला. फैजपूर येथील अधिवेशनात महात्मा गांधींच्या विचारसरणीस अनुसरून त्यांनी मैला वाहणे व ग्राम स्वच्छतेची इतर कामे केली.

साने गुरुजी यांनी राष्ट्र सेवा दलाची स्थापना केली. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहातून त्यांच्या देशभक्तिपर कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यातील बलसागर भारत होवो सारख्या कवितांचा नागरिकांवरील वाढता प्रभाव लक्षात घेऊन ब्रिटिश सरकारने त्या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त केल्या होत्या. त्यातील ही एक कविता-

"बलसागर भारत होवो।
विश्वात शोभुनी राहो।।
हे कंकण करी बांधियले।
जन सेवेत जीवन दिधले।।
राष्ट्रार्थ प्राण हे उरले।
मी सिद्ध मरायाला हो।।"

समाजातील जातिभेद, अस्पृश्यता यांसारख्या अनिष्ट रूढी व परंपरांना साने गुरुजींनी नेहमी विरोध केला. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळावा, यासाठी त्यांनी सन १९४६च्या दरम्यान महाराष्ट्राचा दौरा केला, या भूमिकेला त्यांनी महात्मा गांधींचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न केला, तो शेवटपर्यंत मिळाला नाही. अखेर साने गुरुजींनी या मुद्यावर उपोषणाचा मार्ग अवलंबला व त्यांना यश मिळाले. "एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला खऱ्या अर्थाने मुक्त केले", असे त्या वेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या मार्गाने



त्यांनी भारत जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यांतील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असे या चळवळीत अभिप्रेत होते. ते स्वतः तमिळ, बंगाली आदी भाषा शिकले होते. सन १९४८मध्ये त्यांनी साधना साप्ताहिक सुरू केले. त्यांच्या कथा, कादंबऱ्या, लेख, निबंध, चरित्रे, कविता यांमधून त्यांच्यातील संवेदनशील साहित्यिकही आपल्याला दिसतो. मानवतावाद, सामाजिक सुधारणा व देशभक्ती ही मूल्ये त्यांच्या साहित्यात ठायी ठायी दिसतात. त्यांनी एकूण ७३ पुस्तके लिहिली. त्यांनी त्यांचे बहुतांश लेखन हे तुरुंगात असतानाच केले. श्यामची आई ही सुप्रसिद्ध कादंबरी त्यांनी नाशिकमधील तुरुंगात असतानाच लिहिली. आचार्य विनोबा भावे रचितट गीता प्रवचनेसुद्धा विनोबा भावे यांनी धुळे येथील तुरुंगात-१९३२ साली सांगितली व साने गुरुजींनी लिहिली. याच धुळ्यातील तुरुंगात त्यांनी स्वातंत्र्यलढ्यातील सहभागाबद्दल सुमारे १५ महिन्यांचा तुरुंगवास भोगला. तसेच पुढे बंगलोर येथील तुरुंगात असताना त्यांनी तिरुवल्लिवर नावाच्या कवीच्या कुरल नावाच्या तमिळ महाकाव्याचे मराठीत भाषांतर केले. नंतर फ्रेंच भाषेतील लेस मिझरेबल्स या कादंबरीचे दु:खी या नावाने मराठीत अनुवादन केले. डॉ.हेन्री थॉमस या जगप्रसिद्ध मानववंश शास्त्रज्ञाच्या दी स्टोरी ऑफ ह्युमन या पुस्तकाचे मराठीत मानवजातीचा इतिहास असे भाषांतर केले.

"करील मनोरंजन जो मुलांचे।
जडेल नाते प्रभुशी तयाचे।।" हे गुरुजींच्या जीवनाचे सार होते. मनोरंजनातून मुलांवर सुसंस्कार करण्यासाठी गुरुजींनी अनेक पुस्तके लिहिली. साने गुरुजींचे भारतीय संस्कृती आणि हिंदू धर्मावर निरतिशय प्रेम होते. त्यानी भारतीय संस्कृती हा ग्रंथ लिहिला. तसेच भारतीय संस्कृतीतील अनेक महापुरुषांची चरित्रे लिहिली. त्यांचे मोरी गाय हे पुस्तक प्रसिद्ध आहे. मातृहृदयी गुरुजींनी आई वडिलांच्या प्रेमावर मोलकरीण नावाची अप्रतिम कादंबरी लिहिली ज्यावर पुढे जाऊन मराठी चित्रपट निघाला. गुरुजींनी लिहिलेली ही कविता खरा धर्म शिकविते-

"खरा तो एकचि धर्म,
जगाला प्रेम अर्पावे।।
जगी जे हीन अतिपतित,
जगी जे दीन पददलित।।
तया जाऊन उठवावे,
जगाला प्रेम अर्पावे।।"

ही कविता भारतीय संस्कृतीची द्योतक आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात साने गुरूजी भारतीय समाजातील असमानता दूर करण्याच्या शक्यतेमुळे निराश झाले होते. महात्मा गांधींच्या हत्येचा त्यांच्यावर खोलवर परिणाम झाला. या शोकांतिकेबद्दल त्यांनी दिलेला प्रतिसाद २१ दिवस उपोषणासाठी होता. साने गुरुजी अनेक कारणांमुळे देशाच्या स्वातंत्र्यानंतर खूप अस्वस्थ झाले. दि.११ जून १९५० रोजी झोपेच्या गोळ्यांचा अतिरेक घेत त्यांनी आत्महत्या केली व जीवनयात्रा संपवली.

"अशी पाखरे येती, स्मृती ठेवुनीया जाती।
दोन दिसांची रंगतसंगत, दोन दिसांची नाती।।"

!! साने गुरूजींना सप्ताहभर जयंतीच्या पावन पर्वावर अनंत कोटी विनम्र अभिवादन !!

- संकलन व सुलेखन -

श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.
(संत व थोर पुरुषांचे प्रेरणादायी जीवनचरित्र अभ्यासक.)
रा. रामनगर वॉर्ड नं.04, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- 9423714883.

# चंद्रकोर भाळी

आमचा वंश म्हणजे बिहारमधील फाल्गु नदी.जी गया तिर्थक्षेत्रामुळे विशेष प्रसिद्ध आहे.फाल्गु म्हणायला नदी आहे पण, नेहमी कोरडी ठाक.पुर जरी आला तरी, पुराचं पाणी भाड - भाड गर्जना करत पुढे-पुढे वाहत जाते.. आणि मागे रखरखीत वाळवंट. तसा आमचा अजा वंश म्हणा की, बकरा कुळ म्हणा! या कुळाचा नाही ईतिहास की, नाही विस्तार...!

तरीपण अशा कुळामध्ये माझ्या आईने आम्हा चार भावंडांना जन्म दिला होता. त्यामध्ये मी धष्टपुष्ट तर, होतोच.तशीच माझी कांती ही तपकिरी रंगाची चकचकीत लकाकणारी होती. विशेष सांगण्यासारखी बाब म्हणजे जन्मतःच माझ्या कपाळावर पांढरी शुभ्र चंद्रकोरही होती. म्हणून की काय, पाहणारा प्रत्येकजण माझ्याकडे कुतुहलाने पाहत असे. कोणी मला अलौकिक समजुन चक्क नमस्कार करत असे. माझा मालक मला उत्तमोत्तम खुराक खाऊ घालत असे. मला एकट्या कुठे जाऊ देत नसे, म्हणल्यापेक्षा,मी जाईन तिकडे माझ्या मागे मागेच रहात असे. मी थोडाही नजरे आड झालो तर, कासाविस होत असे. त्याच्या शेतात माझा मुक्त संचार असायचा. त्यामुळे मी अधाशासारखा वागत नसे. मिळालेल्याचा फडशा पाडत नसे. इथे एक घास तर, तिथे दुसरा घास असच चालायचं. ऊलट माझी भावंड उदा. एका तुरीच्या झाडावर भिडले की, तिचे पानं,फुलं,शेंगा फार काय फांद्याच्या काड्या सुद्धा खाऊन खाऊन भुंडं करुन टाकत असत. म्हणतातनं, नेहमी तोट्या घरीच लढाया,मरमर असते. जिथं कमतरता , चनचन असते तिथं, लेकरं बाळं लुस लुस करतात.

मला तर, जुन्या म्हणीप्रमाणे चार कोट जहागीरी होती. ऊडिद, मुग, भुईमुग, कापुस, तुर, ज्वार, गहू,हरभरा,त्याचप्रमाणे पालेभाज्या असो की, फळभाज्या मला कुठेच मज्जाव नव्हता.

मला माझा धनी कधीच एकट्याला कुठे जाऊ देत नव्हता.माझ्या सुरक्षिततेची पूर्ण काळजी घेत होता. तरी पण मी एकटा कसा राहणार ?मला बोलायला, चालायला, ऐकायला आणि ऐकवायला कोणी लागेल की नाही ?मला माझी आई,भावंड,सखे सोबती कोणी लागेल की नाही ?माझ्या मालकाचा नी माझा संवाद केवळ दोन तिन शब्दापुरता मर्यादित होता. हर्रर....रा, हिर हिर, किंवा ये,ये, हर्रर...रा ये बस्स एवढाच मला हसू वाटलं, मला कोणाची मजाक् करु वाटली तर ?माझं काही दुखु लागलं किंवा भूक लागली, तहान लागली तर ? माझ्या मालकाला कसं सांगावं ? त्याला माझी भाषा कशी कळणार ? म्हणून मी त्याची नजर चुकवून चोरून माझ्या आईच्या कळपात जात असे. बरं कळपात गेल्यावर सर्व माझा आदर करत अस. बरेच जन माझं तंतोतंत अनुकरण करत असत. आमच्या कुळातले तरसोडाच इतर कुळातले ही माझं अनुकरण करत असत. जसे मेंढरं,मांजरं,कुत्रे,टोनगे, गाईचे वासरं...माझ्या सारखं तंतोतंत चालनं, ओरडनं, अडव्या तिडव्या तिरकस ऊड्या मारुन पहात असत. एकदा तर मी म्हणालो हीआरे, बाबा तुम्ही तुमच्या कुळासारखे वागा. आपली संस्कृती सांभाळा. प्रत्येकाची प्रकृती वेगवेगळी असते. टोणग्याला बकरीच्या पिलासारखं कसं हुंदडता येईल ? कावळ्याला बगळ्यासारखं कसं जमेल ? या वर ते म्हणायचे, प्रयत्न करायला काय हरकत आहे ? मी फार अक्कल न पाजळता मौन पाळत असे. असो ! असे बरेच दिवस गेले. मी डौलदार दिसू लागलो.मी जसा जसा मोठा होऊ लागलो,तशी तशी मालक माझी जास्त काळजी घेऊ लागला. त्याने माझ्या निगराणीसाठी अजून दोघांना नियुक्त केलं होतं.दिवसेंदिवस मला बघायला येणारांची संख्या वाढू लागली. दुरदुरुन लोकं मला बघायला येऊ लागले. आल्या बरोबर ते मला म्हणण्यापेक्षा माझ्या कपाळावरची चंद्रकोर पाहताच आनंदून जात असत.

**कलानंद जाधव**

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

## महत्त्वाचे...



### राजस्थानमध्ये सीमेजवळ नवीन एअरबेस तयार होणार

राजस्थानला लागून असलेल्या भारत-पाक सीमेवर आता हवाई तळ (एयरबेस) उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नवीन हवाई तळावरून पाकिस्तानच्या 3 मोठ्या हवाई तळांपर्यंत भारतीय लढाऊ विमाने लवकर पोहोचू शकतील. नवीन हवाई तळासाठी सादुलशहर (श्रीगंगानगर) तहसीलच्या आसपासच्या परिसरातील जमिनीच्या अधिग्रहणाचा मार्ग मोकळा झाला आहे. खरं तर, अधिग्रहणाविरोधात 58 शेतकरी आणि जमीन मालकांनी याचिका दाखल केली होती. राजस्थान उच्च न्यायालयाने (जोधपूर) 18 डिसेंबर रोजी झालेल्या सुनावणीत सर्व याचिका फेटाळून लावल्या. न्यायमूर्ती डॉ. नूपुर भाटी यांनी फॉरवर्ड कंपोजिट एव्हिएशन बेस (FCAB) साठीच्या भूसंपादनाला योग्य ठरवले आहे.

उच्च न्यायालयानुसार - ही रिट याचिका केवळ तांत्रिक आक्षेपांच्या आधारे राष्ट्रीय महत्त्वाच्या संरक्षण प्रकल्पाला थांबवण्याचा प्रयत्न आहे.

### जानेवारी-2026 मध्ये देशभरात 16 दिवस बँका बंद राहतील




मुंबई : नवीन वर्षाच्या पहिल्या महिन्यात म्हणजेच जानेवारी 2026 मध्ये देशातील विविध राज्यांमध्ये एकूण 16 दिवस बँकांचे कामकाज बंद राहील. भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) ने जारी केलेल्या ताज्या कॅलेंडरनुसार, पुढील महिन्यात 4 रविवार आणि दुसऱ्या-चौथ्या शनिवार व्यतिरिक्त 10 दिवस वेगवेगळ्या ठिकाणी बँका बंद राहतील.अशा परिस्थितीत, जर तुम्हाला पुढील महिन्यात बँकेशी संबंधित काही महत्त्वाचे काम असेल तर या सुट्ट्या लक्षात ठेवाव्या लागतील. येथे पहा जानेवारी 2026 मध्ये तुमच्या राज्य किंवा ठिकाणी बँका कधी-कधी बंद राहतील...

तुम्ही बँकांच्या सुट्ट्या असूनही ऑनलाइन बँकिंग (UPI, IMPS, NEFT, RTGS) आणि ATM द्वारे पैशांचे व्यवहार किंवा इतर कामे करू शकता. या सुविधांवर बँकांच्या सुट्ट्यांचा कोणताही परिणाम होणार नाही. जानेवारी 2026 मध्ये शेअर बाजारात 9 दिवस ट्रेडिंग होणार नाही. BSE च्या अधिकृत वेबसाइटनुसार, 4 रविवार आणि 4 शनिवार व्यतिरिक्त, 26 जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ट्रेडिंग बंद राहील.

### सोने-चांदी सलग तिसऱ्या दिवशी विक्रमी उच्चांकावर



सोन्या-चांदीचे दर आज, 24 डिसेंबर रोजी सलग तिसऱ्या दिवशी सर्वोच्च पातळीवर आहेत. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन (IBJA) नुसार सोने 352 रुपयांनी वाढून 1,36,635 रुपये प्रति 10 ग्रॅम झाले आहे. यापूर्वी मंगळवारी ते 1,36,283 रुपयांवर होते.तर, 1 किलो चांदीची किंमत 7,934 रुपयांनी वाढून 2,18,954 रुपये प्रति किलोच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचली आहे. काल याची किंमत ₹,11,020/किलो होती. दहा दिवसांत चांदी 30,673 रुपयांनी महाग झाली आहे. 11 डिसेंबर रोजी याची किंमत 1,88,281 रुपये प्रति किलो होती.

# नाराजी घरी चालते, समाजात काम करताना नाही

## सुप्रिया सुळेंचे प्रशांत जगपात यांना खडेबोल; कार्यकर्त्यांच्या मताला पसंती असल्याची भावना

दिव्य वतन /वृत्तसंस्था

पुणे महापालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांची युती होण्याची शक्यता आहे. पण शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी त्याला कडाडून विरोध केला आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी बुधवारी त्यांना चांगलेच खडेबोल सुनावले. नाराजी घरी चालते, समाजात काम करताना नाही, असे त्या म्हणाल्या. त्यांच्या या विधानावर जगपात काय भूमिका घेतात? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका पदाधिकाऱ्याने नुकतेच तुतारीचे उमेदवार घड्याळावर लढणार असल्याचे सूतोवाच केले होते. त्यानंतर प्रशांत जगताप यांनी हे वृत्त जोरकसपणे फेटाळून लावले आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची घोषणा झाली तर माझा राजीनामा तयार आहे, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या भूमिकेमुळे पुण्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ माजली आहे. या पार्श्वभूमीवर सुप्रिया सुळे यांनी त्यांना वरील खडेबोल सुनावलेत.

सुप्रिया सुळे आज पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या, प्रशांत जगताप यांनी उपस्थित केलेले प्रश्न रास्त आहेत. पण सगळ्या कार्यकर्त्यांचे मत महत्त्वाचे आहे. ही निवडणूक आहे. अशी नाराजी घरी चालते. नाराजी लोकशाहीत मान्य नाही. अशी नाराजी पक्षात चालत नाही. समाजात काम करताना नाराजी चालत नाही. ममी येथे पक्षाच्या बैठकीला आले आहे. गत अनेक दिवस संसदेचे अधिवेशन सुरू होते. त्यात अनेक विधेयके सादर करण्यात आली. मी अतिशय महत्त्वाच्या वेळी दिल्लीत होते. आज महापालिका निवडणुकीविषयी काय निर्णय घ्यायचा याचा आढावा घेतला जाईल.महाविकास आघाडी पुण्याच्या विकासासाठी लढणार आहे. त्यात समविचारी पक्ष आले तर त्यांचे स्वागतच आहे. निवडणुका येतील व जातील. पण प्रदुषणाचे काय? सत्ताधाऱ्यांनी 24 तास पाणी पुरवठा करण्याची ग्वाही दिली होती. पण आज आमच्या बिल्डिंगमध्ये टँकर येतो. अनेक ठिकाणी पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे. मी तूतू, मी मी करत बसणार नाही. पुण्यात चांगला बदल हवा असेल तर सर्वांना एकत्र यावे लागेल. या प्रकरणी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यावर चर्चा सुरू आहे, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ठाकरे बंधूंच्या युतीवर सडकून टीका केली आहे. ठाकरे बंधूंची युती ही केवळ निवडणुकीचा फंडा आहे. मुंबई महाराष्ट्रापासून तोडता येणार नाही हे 4 वर्षांच्या पोरालाही कळते. उद्धव ठाकरे यांची ही कॅसेट आता जुनी झाली आहे. या घिसीपिटी कॅसेटला आता कुणीही विचारत नाही, असे ते म्हणालेत. वाचा सविस्तर



# माजी भाजप आमदाराला जामीन, पीडित म्हणाली-हे मला मारून टाकतील!

## यूपीमध्ये बलात्कारी कुलदीप सेंगर बाहेर, माझे काका अजूनही तुरुंगातच

दिव्य वतन /वृत्तसंस्था



'दिल्लीत निर्भयाला मारण्यात आले. हाथरसमध्ये पीडितेला मारण्यात आले. मी वाचले, म्हणून मला जिवंतपणी शिक्षा दिली जात आहे. हे लोक माझ्या कुटुंबाला आणि साक्षीदारांना मारून टाकतील.'

हे शब्द उन्नाव बलात्कार पीडितेचे आहेत. या प्रकरणात दोषी असलेले भाजपचे माजी आमदार कुलदीप सिंह सेंगर यांना दिल्ली उच्च न्यायालयाने मंगळवारी जामीन मंजूर केला आहे. न्यायमूर्ती सुब्रमण्यम प्रसाद आणि हरीश वैद्यनाथन शंकर यांच्या खंडपीठाने सेंगरच्या शिक्षेला अपिलावरील सुनावणी पूर्ण होईपर्यंत स्थगिती दिली. कुलदीप आता बाहेरच राहणार आहे. या संपूर्ण प्रकरणावर दिव्य मराठी ने पीडितेशी संवाद साधला. सध्याची परिस्थिती समजून घेतली. त्या भूतकाळावरही चर्चा केली, ज्याने पीडितेचे जीवन पूर्णपणे उद्ध्वस्त केले.

दिल्ली उच्च न्यायालयाने कुलदीप सिंह सेंगरला जामीन मंजूर करण्याच्या निर्णयात काही अटीही घातल्या आहेत. कुलदीप जामीन कालावधीत दिल्ली सोडू शकणार नाही. पीडितेच्या ५ किलोमीटरच्या परिसरात जाणार नाही. पासपोर्टही जमा करावा लागेल.

उच्च न्यायालयाने असेही म्हटले की, सेंगरला प्रत्येक सोमवारी पोलीस ठाण्यात हजेरी लावावी लागेल. जर त्याने कोणतीही अट मोडली, तर जामीन रद्द होईल. ज्यावेळी हा निकाल दिला जात होता, त्यावेळी पीडिता दिल्लीत न्यायालयाबाहेर होती. ती रडू लागली.पीडिता या निकालामुळे खूप दुःखी आहे. ती म्हणते - हे लोक खूप शक्तिशाली आहेत. न्यायालयाने 5 किलोमीटर दूर राहण्यास सांगितले आहे, पण त्यांचे लोक तर पोहोचतीलच ना. खरा धोका तर त्याच लोकांपासून आहे. हे लोक माझ्या कुटुंबाला संपवून टाकतील. माझ्या प्रकरणात जे साक्षीदार होते, त्या सर्वांची सुरक्षा काढून टाकण्यात आली. या निकालानंतर त्यांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. ते सर्व तर त्याच उन्नावमध्ये आहेत. आता त्यांच्याकडे सुरक्षा देखील नाही.

पीडितेने दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हटले- तुम्ही पाहाल की, ज्या कोणत्याही प्रकरणात युक्तिवाद पूर्ण होतो, त्यात 2-3 दिवसांत किंवा 1 आठवड्यात निकाल येतो. पण हे प्रकरण 3 महिने लटकवून ठेवण्यात आले. शेवटी 3 महिने का थांबवले, जेणेकरून पूर्ण तडजोड करता येईल. भाजपचे सरकार आहे. हा भाजपचाच नेता आहे. म्हणून त्याची शिक्षा निलंबित झाली आहे आणि तो जामिनावर बाहेर येत आहे.पीडितेने सांगितले- कुलदीपने माझ्यावर बलात्कार केला. त्याच्या भावाने माझ्या वडिलांची हत्या केली, पण आता दोघेही बाहेर आहेत. दुसरीकडे, माझे काका ज्यांनी कोणावरही बलात्कार केला नाही, कोणाची हत्या केली नाही आणि कोणाची छेडही काढली नाही, ते 7 वर्षांपासून तिहार तुरुंगात बंद आहेत.

# मी खरा वाघ, त्यांच्यासारखा कागदी नाही

## रावसाहेब दानवेंचा ठाकरे बंधूंवर पलटवार

दिव्य वतन /वृत्तसंस्था



मुंबई - राज्यात मनसे आणि शिवसेना ठाकरे गट यांच्या युतीची घोषणा झाल्यानंतर सुरू झालेला शाब्दिक कलगीतुरा आता शिगेला पोहोचला आहे. ठाकरे बंधूंनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर आणि निवडणूक निकालांवरून जोरदार निशाणा साधला. माझे बोलणे त्यांच्या जिव्हारी लागल्यानेच त्यांनी माझ्यावर टीका केली, असे दानवे यावेळी म्हणाले.

पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी दानवेंची खिल्ली उडवली होती. त्याला उत्तर देताना दानवे म्हणाले, मी या पक्षात जनता पार्टीच्या काळापासून निष्ठेने काम करत आहे. पक्षाने मला सभापती, आमदार, खासदार, दोनदा केंद्रात मंत्री आणि राज्याचा अध्यक्षही केले. उद्धव ठाकरेंसारखा काळा बुरखा घालून किंवा शेपूट घालून मी विधानपरिषदेत गेलो नाही. मी सात वेळा जनतेतून निवडून आलो आहे. समोरून डरकाळी फोडत विधानसभेत आणि लोकसभेत जाणारा मी खरा वाघ आहे, त्यांच्यासारखा कागदी वाघ नाही.

**नऊ आणि सातच्या आकड्यांवरून टोला**

दोन्ही पक्षांच्या निवडणूक कामगिरीवर बोट ठेवताना रावसाहेब दानवे यांनी आकडेवारीच सादर केली. मी वर्तवलेले भविष्य खरे ठरले आहे. प्रचारादरम्यान मला परिस्थिती समजत होती, म्हणूनच मी म्हणालो होतो की निवडणुकीनंतर यांचा पक्ष राहणार नाही. अखेर झाले काय? एकाचे 9 आमदार आले आणि एकाचे 7. साधी दोन अंकी संख्याही त्यांना गाठता आली नाही. मग त्यांना माझे बोलणे झोंबायचे कारण काय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

**राज ठाकरेंना ठेवले 'वेटिंग'वर**

राज ठाकरे यांनी केलेल्या टीकेबाबत विचारले असता दानवे यांनी सावध पवित्रा घेतला. दोन्ही भावांवर एकाच वेळी टीका करायला नको. राज साहेबांना सध्या 'वेटिंग'वर ठेवा. उद्या ते काय बोलतात ते पाहू आणि मगच त्यांना उत्तर देऊ, असे म्हणत त्यांनी राज ठाकरेंवरील तोफ तूर्तास राखून ठेवली आहे.

**संजय राऊतांनाही दिले प्रत्युत्तर**

भोकरदनमधील भाजपच्या पराभवावरून संजय राऊत यांनी केलेल्या टीकेचाही दानवेंनी समाचार घेतला. भोकरदनचे सामाजिक समीकरण वेगळे आहे. जे लोक आमच्याकडून तुमच्याकडे गेले, त्यांनीच तुमचा सत्यनाश केला. त्यांच्या नादी लागल्यामुळेच तुमचा आकडा नऊवर आला आहे, असा टोला त्यांनी राऊतांना लगावला.

# दिल्ली मेट्रोच्या फेज 5 (A) ला सरकारची मंजुरी:13 नवीन मेट्रो स्टेशन बांधले जातील

दिव्य वतन /वृत्तसंस्था



दिल्लीत बुधवारी केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, दिल्ली-एनसीआरमध्ये मेट्रोच्या विस्तारासाठी दिल्ली मेट्रोच्या फेज 5A ला सरकारने मंजुरी दिली आहे. यासाठी ₹2015 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

दिल्ली मेट्रोच्या फेज 5A मध्ये 13 नवीन स्थानके बांधली जातील. 16 किमीची नवीन लाईन टाकली जाईल. यामुळे दिल्ली-एनसीआरमधील मेट्रोचा मार्ग 400 किमीच्या पुढे जाईल. फेज-5A चे बांधकाम 3 वर्षांत पूर्ण होईल. बहुतेक काम भूमिगत असेल.

वैष्णव यांनी सांगितले की, बांधकामात टनेल बोरिंग मशीन (TBM) चा वापर केला जाईल, ज्यामुळे वाहतुकीवर कमी परिणाम होईल. त्यांनी सांगितले की, दिल्ली मेट्रोमध्ये दररोज सरासरी 65 लाख लोक प्रवास करतात. पीक दिवसांमध्ये ही संख्या 80 लाखांपर्यंत पोहोचते.

12 डिसेंबर रोजीही मंत्रिमंडळाची बैठक झाली होती. वैष्णव यांनी सांगितले की, देशात 2027 मध्ये पहिल्यांदाच जनगणना डिजिटल पद्धतीने होईल. केंद्र सरकारने शुक्रवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासाठी 11,718.24 कोटी रुपयांना मंजुरी दिली आहे. यानुसार, एका व्यक्तीच्या जनगणनेवर सरकारचे सुमारे 97 रुपये खर्च होतील.

खरं तर, 2011 च्या जनगणनेत भारताची लोकसंख्या सुमारे 121 कोटी होती. जर याला आधार मानले, तर 1 व्यक्तीची गणना करण्यासाठी सुमारे 97 रुपये खर्च (11,718.24 कोटी रुपये/121 कोटी लोकसंख्या) येईल.

# अतिक्रमण हटवताना दाम्पत्याने स्वत:ला आग लावली

## देवासमध्ये गंभीर भाजले, दोघेही इंदूरला रेफर; लोकांनी रास्ता रोको केला

दिव्य वतन /वृत्तसंस्था



दिल्ली- मध्य प्रदेशच्या देवासमध्ये अतिक्रमण हटवण्यासाठी आलेल्या पथकासमोर पती-पत्नीने स्वतःला आग लावली. दोघे गंभीररित्या भाजले. दाम्पत्याला प्राथमिक उपचारानंतर इंदूरला रेफर करण्यात आले आहे. इकडे, जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना जिल्हाधिकारी कार्यालयात संलग्न केले आहे.ही घटना खातेगावच्या सतवासमध्ये बुधवारी घडली. माहितीनुसार, सतवास बस स्टँडवर स्टेशनरी आणि फोटोकॉपीचे दुकान चालवणारे संतोष व्यास एका कॉलनीत घराचे बांधकाम करत होते.प्रशासनाला या बांधकामात अतिक्रमणाची तक्रार मिळाली होती. यानंतर बुधवारी तहसीलदार अरविंद दिवाकर जेसीबी मशीनसह बांधकाम हटवण्यासाठी घटनास्थळी पोहोचले. कारवाईदरम्यान संतोष व्यास आणि त्यांची पत्नी जयश्री व्यास यांची तहसीलदारांशी बाचाबाची झाली. याच दरम्यान, दाम्पत्याने तहसीलदारांसमोरच स्वतःवर पेट्रोल टाकून आग लावली.

घटनास्थळी उपस्थित लोकांनी तात्काळ आग विझवण्यास सुरुवात केली. आग विझेपर्यंत पती-पत्नी गंभीर भाजले होते. घटनेनंतर परिसरात मोठा संताप पसरला. संतप्त लोकांनी सतवास बस स्टँडवर पोलीस ठाण्यासमोर रास्ता रोको केला आणि तहसीलदारांविरोधात घोषणाबाजी केली.लोकांनी पोलीस ठाण्याबाहेर पोलीस अधिकाऱ्यांना घेराव घातला. अतिक्रमण हटवण्याची कारवाई करण्यासाठी आलेल्या पथकाने कुटुंबाला धमकावले आणि पैसे मागितले, असा आरोप लोकांनी केला. एवढा भ्रष्टाचार आहे. प्रशासन काय करत आहे?

**दाम्पत्याच्या कुटुंबीयांनी कारवाईला बेकायदेशीर ठरवले**

दाम्पत्याला आधी सतवासमध्ये प्राथमिक उपचार देण्यात आले. त्यांची गंभीर प्रकृती पाहून त्यांना इंदूरला रेफर करण्यात आले. इकडे, व्यास कुटुंबीयांनी प्रशासकीय कारवाईला बेकायदेशीर ठरवले आहे. त्यांचा आरोप आहे की, ज्या इमारतीचे बांधकाम केले जात होते, त्यासाठी पूर्वीच सर्व आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या होत्या.

# मोदींनी VB-G RAM G कायद्याचे समर्थन केले; गावांमध्ये रोजगारासोबत संपत्ती निर्माण होईल

## नवीन कायदा मनरेगाची जागा घेईल

दिव्य वतन /वृत्तसंस्था

दिल्ली- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी विकसित भारत हमी रोजगार आणि उपजीविका अभियान (ग्रामीण) कायदा (VB-G RAM G) 2025 ला पाठिंबा दिला. ते म्हणाले की, हा कायदा केवळ ग्रामस्थांना मजुरी देण्यापुरता मर्यादित नाही, तर यामुळे गावांमध्ये कामासोबतच कायमस्वरूपी मालमत्ता निर्माण होतील, शेतीला बळकटी मिळेल आणि दीर्घकाळात ग्रामीण भागाची उत्पादकता वाढेल.

पंतप्रधान कार्यालयाच्या (PMO) माहितीनुसार, हा कायदा बनवण्यापूर्वी केंद्र सरकारने राज्य सरकारांशी चर्चा केली. याव्यतिरिक्त, तज्ज्ञांसोबत तांत्रिक बैठका आणि विविध भागधारकांशी चर्चा देखील करण्यात आली, जेणेकरून सर्व पैलू विचारात घेतले जातील.

VB-G RAM G विधेयक संसदेच्या हिवाळी अधिवेशनात विरोधकांच्या गदारोळ आणि विरोधादरम्यान 18 डिसेंबर रोजी मंजूर झाले होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 21 डिसेंबर रोजी याला मंजुरी दिली, त्यानंतर हा कायदा बनला. हा नवीन कायदा मनरेगा (MGNREGA) च्या जागी लागू केला जाईल.

पंतप्रधान कार्यालयाने (PMO) सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांचा एक लेख शेअर केला.

शिवराज म्हणाले- काँग्रेस नेते गैरसमज पसरवत आहेत

यापूर्वी मंगळवारी नागौरमध्ये शेतकरी परिषदेला संबोधित करताना चौहान म्हणाले होते- 'काँग्रेस चिंतेत आहे आणि योजनेवर टीका करत आहे. ते दावा करत आहेत की यामुळे नोकऱ्या हिरावल्या जातील. ही एक उत्तम योजना आहे जी गावांना पूर्णपणे बदलून टाकेल.'

ते म्हणाले, 'आम्ही ते कमी केले नाही तर वाढवले आहे. ते मजुरांना घाबरवण्याचा आणि गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न करत आहेत. योजनेअंतर्गत आता एकूण वार्षिक खर्च अंदाजे 1.51 लाख कोटी रुपये आहे. काँग्रेसमध्ये बसलेले लोक ना शेती समजतात ना गाव. त्यांनी ना शेती पाहिली आहे ना गाव ना माती. त्यांना हे देखील माहित नाही की बटाटे जमिनीखाली उगवतात की वर.'

तथापि, VB-G RAM G कायद्यावरून राजकीय विरोधही समोर आला आहे. डीएमकेच्या नेतृत्वाखालील आघाडीने चेन्नईमध्ये या कायद्याविरोधात निदर्शने केली. विरोधी पक्षांचा आरोप आहे की, नवीन नियमांमुळे रोजगार हमी कमकुवत होईल आणि केंद्र व राज्यांमध्ये समन्वय बिघडेल.

सरकारने सांगितले की, नवीन कायद्यानुसार प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला आता वर्षातून १२५ दिवस कामाची हमी मिळेल, जी पूर्वी १०० दिवस होती. यामुळे गावांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांना अधिक काम मिळेल आणि त्यांची आर्थिक सुरक्षा मजबूत होईल.



## फॅशन...

### मी सिंगल आहे कारण...' प्राजक्ता माळीच्या पोस्टने वेधलं लक्ष;



अभिनेत्री प्राजक्ता माळी मराठी मनोरंजन विश्वातील एक लोकप्रिय कलाकार आहे. त्यामुळे तिच्या वैयक्तिक आयुष्याविषयी सोशल मीडियावर नेहमीच चर्चा होते.त्यामुळे प्राजक्ता लग्न कधी करणार, तिच्या आयुष्यात कोणी जोडीदार आहे का... असे प्रश्न अनेकदा चाहत्यांकडून विचारले जातात. मात्र अभिनेत्रीने याबद्दल कधी खुलासा केलेला नाही.अलिकडेच तिने एक मजेशीर वाक्य सोशल मीडियावर शेअर केले. या कोटद्वारे तिने ती अद्याप सिंगल का आहे, याचे कारण सांगितले.प्राजक्ताने एका इन्स्टाग्राम पेजवरील वाक्य तिच्या स्टोरीवर हसण्याच्या इमोजीसह शेअर केले. ज्यात असे म्हटले आहे की, 'मी सिंगल आहे कारण मी लोकांचा द्वेष करते, पण मला अशा व्यक्तीचा शोध घ्यायचा आहे, जिचा मी द्वेष करणार नाही, पण ती व्यक्तीही मी सोडून इतरांचा द्वेष करत असेल.'

### फेम अभिनेत्याने बांधली लग्नगाठ; कलाकारांच्या उपस्थितीत थाटामाटात पार पडला सोहळा



अभिनेता आणि रिॲलिटी शो स्टार Jay Dudhane सध्या त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आला आहे. अलिकडेच मोठ्या थाटामाटात जयचा साखरपुडा पार पडला. त्यानंतर 2025 हे वर्ष संपण्यापूर्वीच जय बोहल्यावर चढला आहे. 24 डिसेंबर रोजी जयने लग्नगाठ बांधली. जयने सोशल मीडिया इन्स्फ्लूएन्सर असणाऱ्या हर्षला पाटील हिच्याशी लग्न केले. त्यांच्या लग्नसोहळ्यातील काही खास व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. 'बिग बॉस मराठी 3' या पर्वाचा उपविजेता ठरलेल्या जयच्या लग्नसोहळ्याची गेल्या काही दिवसांपासून चर्चा आहे. 23 डिसेंबर रोजी त्याच्या हळद समारंभाचे विविध व्हिडिओ व्हायरल झाले होते. जय आणि हर्षला या दोघांनाही एकाच मंडपात हळद लावण्यात आली. दुधाणे आणि पाटील कुटुंबातील सदस्यांसह यावेळी काही कलाकार मंडळीही उपस्थित होते. जय-हर्षला यांच्या लग्नसोहळ्यातही मराठी मनोरंजन विश्वातील आणि 'बिग बॉस मराठी' गाजवणारे कलाकार उपस्थित होते. Bigg Boss Marathi फेम सुरेखा कुडची, तृप्ती देसाई आणि तसेच अभिनेते प्रवीण तरडे यावेळी उपस्थित होते. लग्नसोहळ्याच्या या खास दिवसासाठी जयने खास आउटफिटही परिधान केला होता. खास नक्षीकाम असणारे पिवळ्या रंगाचा कुर्ता-धोती आणि त्यावर मॅचिंग फेटा-उपर्ण असा लूक त्याने केला होता. तर हर्षला दाक्षिणात्य पद्धतीची पिवळ्या-गुलाबी रंगाची साडी नेसली होती. त्यांच्या वरमाला विधीदरम्यानचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

### देशमुखांच्या घरी परतली 'लक्ष्मी', काव्याने घरात येताच पिरगळला रम्याचा हात



Lagnanantar Hoilach Prem च्या 24 December 2025 च्या भागाच्या सुरुवातीला जीवा वारंवार नंदिनीला फोन करतो, पण ती उलचत नाही. शेवटी तो आरूषीला फोन करुन नंदिनीशी बोलणं करुन द्यायला सांगतो. नंदिनी तेव्हाही बोलायला नकार देते, तेव्हा आरुषी फोन स्पीकरवर ठेवून देते. जीवा नंदिनीसमोर त्याचं मन मोकळं करतो अन् प्रेमही व्यक्त करतो. त्याच्या आयुष्यात नंदिनीचं किती महत्व आहे हेही सांगतो, पण नंदिनी एक शब्दही बोलत नाही. दोघेही ओक्साबोक्शी रडतात, पण त्यांच्यातील मतभेद दूर होत नाही. जीवा रडतच देवाकडे विनंती करतो की, नंदिनी त्याच्याकडे परत यावी.दुसरीकडे रम्या आणि वसुंधरा या आनंदात असतात की, पार्थच्या मनातील आग आता कधीच विझू शकत नाही. आग धुमसत ठेवूया, असं त्या ठरवतात. वसुंधरा असंही सांगते की, काव्याच्या तोंडाला काळं फासायला गेलेल्या महिला तिच्याच ओळखीच्या होत्या. त्या दोघीही ठरवतात की, नंदिनी आणि पार्थ त्यांच्या नात्याबद्दल जो काही निर्णय घेतील, त्यावरुन त्या पुढचा कट आखतील. तर मोहितेंच्या घरी काव्याची जिवलग मैत्रीण अनिशा तिला भेटायला येते. काव्या तिच्या मनातील पार्थविषयीच्या भावना अनिशासमोर व्यक्त करते. 'काव्यार्थ' असं लिहिलेलं पेन्डन्ट पार्थने स्वतःच्या हाताने तोडलं, त्यावरूनही रडतच काव्या म्हणते की, 'काव्या आणि पार्थ आता वेगळे झाले गं...' बेस्ट फ्रेंडच्या नात्याने अनिशा काव्याच्या भावना समजून घेते, ती काव्याला समजावते की, 'काव्यार्थ कधीच वेगळे होणार नाहीत. ती काव्याला तिच्या पार्थसाठी लढण्याचं बळही देते. ती काव्याला प्रोत्साहित करते की, काव्याने तिचं प्रेम परत मिळवण्याचं आव्हान स्वीकारावं. अनिशाच्या बोलण्याने काव्यालाही हुरुप येतो. शिवाय आजच्या भागात पार्थ-जीवाची आई मानिनी आणि काव्या-नंदिनीची आई शारदा यांच्यातही बोलणं होतं. शारदा तिची बाजू मांडते की, तिच्या दोन्ही मुलींचे संसार टिकावेत याकरता तिने काव्याला अट घातली होती की, तिने जीवासोबतच्या नात्याबद्दल कोणाला सांगू नये. त्यावेळी मानिनीदेखील काव्याची बाजू घेते. काव्याने सर्वांचा विचार करुन आईचा सल्ला मानला, यावरुन ती कौतुक करते. शिवाय दोन्ही जोडप्यांसाठी घटस्फोट हा पर्याय नाही, याबाबत या दोन्ही आईंचं एकमत होतं. ' लग्नानंतर होईलच प्रेम 'च्या लेटेस्ट भागात असेही दाखवले आहे की, नंदिनी तिच्या आणि जीवाच्या काउन्सिलरला माहेरच्या घरी बोलावून घेते. ती त्यांना सांगते की, ती आता कायमची माहेरी आली आहे आणि तिला फास्ट ट्रॅकमध्ये डिव्होर्स हवा आहे. तिच्या तातडीने घटस्फोट घ्यायच्या निर्णयात धनंजयही लेकीची साथ देतो. नंदिनीच्या आईला मात्र हा घटस्फोट होऊच नये असं वाटतं. काऊन्सिलरही हे नातं टिकवण्यासाठी प्रयत्न करतात.

# ईद २०२६ला पाच भाषांत रिलीज होईल 'धुरंधर २'

## कथा व ॲक्शन आधीपेक्षा मोठ्या स्तरावर, परदेशी बाजारपेठांमध्येही मोठी मागणी



हा चित्रपट ईद 2026 रोजी 19 मार्चला प्रदर्शित होईल. हिंदी, तेलुगु, तमिळ, कन्नड आणि मल्याळम- अशा एकूण पाच भाषांमध्ये एकाच वेळी प्रदर्शित होईल, जे याला खरा पॅन-इंडिया चित्रपट बनवेल.

पहिला चित्रपट फक्त हिंदीमध्ये प्रदर्शित झाला होता, पण दक्षिणेत सोशल मीडिया, वर्ड ऑफ माउथ आणि पुन्हा पुन्हा पाहणाऱ्या प्रेक्षकांमुळे त्याची क्रेझ निर्माण झाली होती. तिथल्या वितरकांनी डब केलेल्या आवृत्तीची मागणी केली होती. आता निर्मात्यांनी दक्षिण आणि परदेशी प्रेक्षकांना लक्षात घेऊन सर्व भाषांमध्ये प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला आहे.

राष्ट्रीय पुरस्कार विजेते आदित्य धर दिग्दर्शन करत आहेत. जिओ स्टुडिओज आणि B62 स्टुडिओज निर्मितीची जबाबदारी सांभाळत आहेत. कथा आणि ॲक्शन पूर्वीपेक्षा मोठ्या स्तरावर दाखवली जाईल.

चित्रपट सध्या पोस्ट-प्रोडक्शनमध्ये आहे आणि 2026 मधील सर्वाधिक अपेक्षित चित्रपटांपैकी एक बनला आहे. निर्माते परदेशी बाजारातही प्रदर्शनाची योजना आखत आहेत.

### सिनेमाच्या ऑडिशनला दिलेला नकार अन् ओंकार राऊतची झाली हास्यजत्रेत एन्ट्री



मुंबई - 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाचा मोठा चाहतावर्ग आहे. त्यातील कलाकारसुद्धा कायम चर्चेत असतात. हास्यजत्रेनं नवोदित कलाकारांना संधी दिली आणि यामुळे अनेक कलाकार नावारूपाला आले. मराठी अभिनेता ओंकार राऊतने हास्यजत्रेपूर्वी सिनेमा केला असला तरी त्याला खरी ओळख हास्यजत्रेनं मिळाली. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये ओंकार राऊतने 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मध्ये एन्ट्री कशी झाली, याबद्दल सांगितलं आहे.

'कविरत स्टुडिओ'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये ओंकार राऊत म्हणाला की, 'मला देवाचा खूप आशीर्वाद आहे. जर मी 'टाईमपास १' मध्ये नसलो असतो तर मी हास्यजत्रेतही नसलो असतो. त्याची पण एक स्टोरी आहे. 'टाईमपास १'साठी आधीच सिलेक्शन झालेलं. माझ्या एका मित्राने मला सांगितलेलं, सिनेमासाठी ऑडिशन दे. पोखरण रोड, ठाण्याला ऑडिशन होतं. मी दादरचा मुलगा, त्यामुळे कोण जाणार पोखरण रोडला. मग झालं कास्टिंग. पण, काही कारणामुळे ते कास्टिंग कॅन्सल झालं. पुन्हा त्या मित्राचा मला फोन आला, आता तरी ये. तेव्हा मी गेलो आणि मला कळलं मोठा सिनेमा आहे. 'टाईमपास २' झाला, त्यात समीर दादाने लायब्रेरियनची भूमिका केलेली. तशी देवाच्या कृपेनेच मला ती फिल्म मिळाली.'

'२०२० मध्ये 'टाईमपास ३'चं शूटिंग सुरू झालं. तेव्हा समीर दादाचं हास्यजत्रा सुरू होतं. तेव्हा सगळेच बघायचे हास्यजत्रा. आमची व्हॅनिटी वेगळी होती. पण, त्यात पाणी पडायला लागलं. म्हणून आम्ही बाहेर थांबलो. तर समीर दादाची व्हॅनिटी वेगळी होती. आम्हाला बाहेर बघून दादाने आम्हाला विचारलं, 'तुम्ही बाहेर काय करताय? माझ्या व्हॅनिटीमध्ये येऊन बसा', असं त्याने सांगितलं. आम्ही आत गेल्यावर मी त्याला एक फॅन म्हणून त्याच्या स्किटबद्दल सांगितलं. तेव्हा त्याने मला विचारलं, 'तू का येत नाहीस मग?' मी विचारलं, कसं यायचं? त्याने सांगितलं, 'ऑडिशन आहे, येशील का?' मग मी लगेच होकार दिला.'

'तिकडे विनायक पुरुषोत्तम आहे, माझा ज्युनिअर. शिवाली माझी पहिली ऑडिशन पार्टनर होती. ते ऑडिशन झालं, आवडलं. ९०-९३ लोकांमधून मी सिलेक्ट झालो. स्किट समजायला एक वर्ष गेलं. आम्ही दमणला काम करत होतो, तेव्हा सगळ्यांसोबत माझं चांगलं बॉण्डिंग झालं.' असं ओंकार राऊत पुढे म्हणाला.

### लोकप्रिय जोडी झळकणार मोठ्या पडद्यावर

#### रोमँटिक केमिस्ट्रीने जिंकलेले प्रेक्षकांचे मन



झी मराठीवर '36 गुणी जोडी' या मालिकेत आयुष संजीव आणि अनुष्का सरकटे हे कलाकार झळकले होते. त्यांच्यातील गोड भांडण आणि रोमँटिक केमिस्ट्रीने अल्पावधीत प्रेक्षकांचे मन जिंकले होते. छोट्या पडद्यानंतर आता ही जोडी मोठा पडदा गाजवण्यासाठी सज्ज झाली आहे. अनुष्का आणि आयुष यांचा 'जब्राट' हा मराठी सिनेमा लवकरच रीलिज होणार असून, अलिकडेच या चित्रपटाचे पोस्टर आणि 'तू आणि मी' हे रोमँटिक गाणे रीलिज झाले.

तारा करमणूक निर्मित, प्रगती कोळगे दिग्दर्शित 'जब्राट' या मराठी चित्रपटात आयुषने प्रिन्स हे पात्र साकारले आहे, तर अनुष्का 'निशा' या व्यक्तिरेखेतून प्रेक्षकांच्या भेटीला येईल. या चित्रपटामध्येही त्यांच्यातील रोमँटिक केमिस्ट्री पाहायला मिळणार आहे. नवीन वर्षात 6 फेब्रुवारी 2026 रोजी हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येईल. व्हॅलेंटाइन डेच्या काहीच दिवस आधी हा प्रेमाबद्दलचा सिनेमा रीलिज होणार आहे. चित्रपटातील 'तू आणि मी' हे रोमँटिक गाणे रीलिज होताच चांगला प्रतिसादही मिळाला आहे.

'जब्राट' या संगीतमय चित्रपटात कॉलेज विश्वातील दुनियादारीची कथा पाहायला मिळेल. या कहाणीची एक भावनिक बाजूही असेल. आयुष संजीव, अनुष्का सरकटे या जोडीसोबत वनिता खरात, श्रेया शंकर, राहुल चव्हाण, पुण्यकर उपाध्याय, आयली घिया, हिंदवी पाटील, मंदार मोकाशी, डॉ. ऋषभ गायकवाड, सोहम कांबळे,विक्रम आल्हाट, प्रगती कोळगे यांसोबत संजय मोने, सुरेखा कुडची, जयवंत वाडकर, गणेश यादव अशी स्टारकास्ट या सिनेमात झळकणार आहे.

या चित्रपटाची निर्मिती अनिल अरोरा, गोविंद मोदी, प्रगती कोळगे यांची असून अनिकेत खंडागळे यांचे छायांकन आहे. चित्रपटाच्या नृत्यदिग्दर्शनाची जबाबदारी लोकप्रिय कोरिओग्राफर आशिष पाटीलने सांभाळली असून, वेशभूषा युगेशा ओमकारची आहे. डॉ. जयभीम शिंदे या चित्रपटाला संगीत दिले. तर बेला शेंडे, आर्या आंबेकर, वैशाली माडे, नंदेश उमप, डॉ. जयभीम शिंदे, अनुराग जगदाळे, स्वराज्य भोसले, राजनंदिनी मगर, स्वाती शिंदे अशा अनेक लोकप्रिय गायकांनी यामध्ये गाणी गायली आहेत.





### गोविंदाचे विवाहबाह्य संबंध, सुनीतानेच सांगितलं खरं; म्हणाली, 'ती फक्त पैशासाठी त्याच्यासोबत...'

मुंबई - २०२५ मध्ये गोविंदा आणि सुनीता अहुजाच्या नात्याची बरीच चर्चा झाली. गोविंदाचं मराठी अभिनेत्रीसोबत अफेअर असल्याच्या चर्चा होत्या. त्यामुळे गोविंदा आणि सुनीता घटस्फोट घेत आहेत, असंही म्हटलं गेलं. मात्र, गोविंदा आणि सुनीता यांनी दरवेळी घटस्फोटाच्या अफवांना नकार दिला. आता, सुनीताने गोविंदाच्या अफेअरच्या अफवांना दुजोरा दिला आहे. तिनं असंही म्हटलं आहे की, तिचा पती गोविंदाच्या मागे असलेली महिला अभिनेत्री नाही आणि ती त्याच्यावर प्रेम करत नाही.

ईटाइम्सने सुनीता अहुजाचं वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यासाठी हे वर्ष कसं गेलं? हे जाणून घेण्यासाठी संपर्क साधला तेव्हा सुनीता म्हणाली, 'मी २०२५ हे वर्ष माझ्यासाठी खूप वाईट मानते कारण मी गोविंदाचं एका मुलीशी अफेअर असल्याचं ऐकत आहे, पण मला माहित आहे की, ती अभिनेत्री नाही कारण अभिनेत्री अशा वाईट गोष्टी करत नाहीत. ती त्याच्यावर प्रेम करत नाही. तिला फक्त त्याचे पैसे हवे आहेत.'सुनीता पुढे म्हणाली, 'पण दुसरीकडे, मी २०२५ मध्ये माझं YouTube चॅनेल सुरू केलंय आणि मला यश मिळालंय. याचा मला खूप आनंद आहे आणि लोक माझ्यावर खूप प्रेम करत आहेत. द्वेष करणारे आहेत, पण मी अजूनही त्यांच्यावर प्रेम करते. जर ते माझा द्वेष करत असतील तर तो त्यांचा प्रॉब्लेम आहे.''२०२६ मध्ये मला माझं आयुष्य बदलायचं आहे. गोविंदाने हे सर्व वाद संपवावेत अशी माझी इच्छा आहे आणि २०२६ मध्ये मला एक आनंदी कुटुंब हवं आहे. मला आशा आहे की, हे लवकरच घडेल. गोविंदाने हे समजून घेतलं असेल की, त्याच्या आयुष्यातील तीन सर्वात महत्वाच्या महिला म्हणजे त्याची आई, त्याची पत्नी आणि त्याची मुलगी. त्याच्या आयुष्यात चौथी स्त्री असण्याचा अधिकार कोणालाही नाही. हे जगातील प्रत्येक पुरुषाला लागू होतं, ज्यामध्ये गोविंदा देखील आहे. मला वाटतं की त्याने हे सर्व सोडून त्याच्या कामावर लक्ष केंद्रित करावं, कारण तीसुद्धा फक्त पैशासाठी त्याच्यासोबत आहे. ' असं सुनीताने सांगितलं.२०२६ मध्ये सुनीताला काय करायचं आहे? असं विचारलं असता सुनीता म्हणाली की, 'मला या वर्षी दिवसरात्र काम करायचं आहे. मला मुंबईतील जुहू येथे माझं स्वतःचं घर खरेदी करायचं आहे. मला एक चांगली गाडी खरेदी करायची आहे आणि वर्षभर कठोर परिश्रम करायचे आहेत. मला घरी बसून राहायचं नाही. मला फक्त काम करत राहायचं आहे.'

### पार्टी-चित्रपटासाठी गर्लफ्रेंड नेहमी सोबत :पण गरज किंवा संकटात...



प्रश्न- मी दिल्लीत राहतो, 3 वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये आहे. माझी गर्लफ्रेंड माझ्यावर खूप प्रेम करते. आम्ही दोघेही नोकरी करतो. आम्ही अनेकदा एकत्र क्लबमध्ये जातो, शॉपिंगला जातो. आम्ही एकत्र चित्रपटही पाहतो.

ी माझ्या प्रत्येक चांगल्या क्षणी सोबत असते, पण जेव्हा मी वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत किंवा वैयक्तिक संघर्षात असतो, तेव्हा तिच्याशी आपोआप बोलणे कमी होते, हे मला कळत नाही. मला असे वाटते की ती त्या दिवसांमध्ये अंतर ठेवते. हे नात्यातील असंतुलन आहे की ती तणावामुळे दूर जाते? मी तिला दोष न देता कसे सांगू शकेन की मला भावनिक आधाराची गरज आहे? जर तिला हे सर्व समजत नसेल तर काय करावे?

तज्ज्ञ: डॉ. जया सुकुल, क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट, नोएडा

उत्तर: सर्वात चांगली गोष्ट ही आहे की तुम्ही कोणताही निर्णय घेण्यापूर्वी हा प्रश्न विचारला आहे. तुम्ही सांगितले की तुमचे तीन वर्षांचे नाते आहे, यात तुम्ही खूप काही चांगलेही पाहिले आहे, तरीही तुम्ही तुमच्या भावना इतक्या प्रामाणिकपणे अनुभवत आहात आणि विचारत आहात - ही खूप मोठी गोष्ट आहे. बहुतेक लोक 'चालतंय' असे म्हणून वर्षे घालवतात आणि आतल्या आत घुसमटत राहतात. याचा अर्थ असा आहे की तुम्ही तुमचे नाते आणि स्वतःला वाचवू इच्छिता. हे धैर्य फार कमी लोकांमध्ये असते.

तुमचा प्रश्न चुकीचा नाही

तुम्ही जे अनुभवत आहात, ते अजिबात चुकीचे नाही. चांगल्या काळात साथ देणे सोपे असते, हसणे-मजाक करणे, पार्टी करणे, फिरणे असते. खऱ्या नात्याची परीक्षा तेव्हा होते जेव्हा आयुष्य कठीण होते, जेव्हा रुग्णालयाच्या बिछान्यावर पडलेले असता, जेव्हा नोकरीची चिंता असते, जेव्हा घरात काही दुःख असते, जेव्हा रात्री झोप येत नाही. त्यावेळी जर जोडीदार सोबत नसेल, तर मनात एक पोकळी निर्माण होते. तुमची ही पोकळी योग्य आहे.

यामागे दोन्ही कारणे असू शकतात. काही लोक आपल्या मित्राचा ताण पाहून त्याच्या आणखी जवळ येतात. त्यांना फोन करत राहतात, धीर देतात, सोबत बसतात. तर, काही लोक ताण पाहून घाबरतात आणि टाळू लागतात. बोलणे कमी करतात, व्यस्ततेचे कारण देतात. हे नकळतपणे दोघांमध्येही होऊ शकते.

तुमची गर्लफ्रेंड कदाचित दुसऱ्या प्रकारात मोडते. तिला कदाचित काय बोलावे, कसे हाताळावे हे समजत नाही. अनेकदा लोकांच्या भावनांना लहानपणीच दाबले जाते- रडू नकोस, शांत राहा, त्रास देऊ नकोस. नंतर मोठे झाल्यावर तीच सवय बनते. कोणाचे दुःख पाहून ते स्वतः आतून घाबरतात आणि अंतर ठेवतात. असे नाही की ती तुमच्यावर प्रेम करत नाही. याचा अर्थ असाही असू शकतो की तिला भावनिक आधार कसा द्यावा हे येत नाही.

पण एक कटू सत्य हे देखील आहे की कारण काहीही असो, तुमच्या गरजाही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. जर तुम्हाला अडचणीत एकटे वाटत असेल, तर नात्यात कुठेतरी भावनिक संतुलन बिघडत आहे.

तिला दोष न देता कसे समजावून सांगावे?

कोणत्याही नात्यात, कोणतीही परिस्थिती असो. जर कोणी आरोप केले तर गोष्ट बिघडतेच. तुम्ही तुमच्या भावना सांगा. असा एक दिवस निवडा, जेव्हा दोघेही चांगल्या मनःस्थितीत असतील. कॉफी पिताना किंवा चालताना, खूप हळूवारपणे ही गोष्ट सांगा-

त्याला/तिला स्पष्ट करा की जेव्हा तुम्ही आजारी होता किंवा जेव्हा नोकरीची खूप चिंता होती तेव्हा तुमच्या दोघांमधील संवाद खूप कमी झाला होता. त्यावेळी तुम्हाला खूप एकटेपणा जाणवला. त्याला/तिला सांगा की तुम्हाला हे समजते की कदाचित तू मला स्पेस देऊ इच्छित होतीस, पण माझ्यासाठी त्यावेळी तुझ्यासोबत असण्याने जास्त ताकद मिळाली असती.

## अर्थविश्व...

### शेजाऱ्यांच्या प्लॉटसोबत रिडेव्हलपमेंटमध्ये कमिटीचा खोडा?

आम्ही शिवतीर्थ नगर, पुणे येथील माधवबाग सोसायटी या बंगल्यांच्या सोसायटीत गेली 40 वर्षे राहतो. आम्ही व आमच्या शेजारील प्लॉट मिळून संयुक्त पुनर्विकासासाठी सोसायटीला अर्ज दिला होता. मात्र बऱ्याच काळानंतर जनरल बॉडीमध्ये मतदान घेऊन प्लॉट अमाल्गमेशन आणि नवीन सभासद सदस्यत्वाची मंजुरी घ्यावी लागेल असे सांगितले. मात्र सोसायटीच्या कमिटीने घरोघरी जाऊन वरील ठराव पास होऊ नये यासाठी प्रचार केला. आम्हीसुद्धा वरील ठराव पास होणे पुढील काळात किती फायद्याचे ठरेल हे सांगितले. परंतु जनरल बॉडीमध्ये ठराव सोसायटीच्या बाजूने पारित झाला आणि आमचा प्रोजेक्ट जागेवर थांबला. यात आमचे बरेच आर्थिक नुकसान झाले आहे. या पूर्वी 2-3 प्लॉटचे अमाल्गमेशन झाले आहे, तरी आम्हास योग्य मार्गदर्शन द्यावे.

आपल्यासारखे प्रश्न हे अशा अनेक बंगल्यांच्या सोसायट्यांमध्ये सुरू झाले आहेत. अर्थात प्रत्येकाच्या फॅक्ट वेगळा असू शकतात आणि या प्रश्नांचा विस्तृत ऊहापोह जागेअभावी येथे करणे शक्य नाही. तरीही आपल्या प्रश्नाच्या अनुषंगाने काही कायदेशीर संकल्पना समजून घेणे भाग आहे. आपल्याकडे दुहेरी मालकी ही संकल्पना आहे, म्हणजे जमीन एकाच्या मालकीची आणि त्यावरील बंगला हा मात्र दुसऱ्याच्या मालकीचा असू शकतो. जमीनमालकी असलेल्या पॅरेन्ट सोसायटीने प्रदीर्घ मुदतीच्या (साधारणपणे 999 वर्षांच्या) लीज कराराने सभासदांना दिलेल्या प्लॉटशी सोसायटीचे सभासदत्व निगडित असते. 999 वर्षांचा कालावधी म्हणजे मालकी वाटत असली, तरी सभासद तांत्रिकदृष्ट्या प्लॉटचा मालक होत नाहीच. मात्र अशा प्लॉटवर सभासद जो बंगला बांधतो तो त्याच्या मालकीचा असतो. अशा प्रकारे जमीन आणि बंगला यांचे मालक वेगवेगळे असतात.

### उधारीवर जगणारा पाकिस्तान खड्ड्यात; 135000000000 च्या बोलीवर सौदा पक्का, गुजराती कुटुंब नवे मालक




गरीब पाकिस्तानची परिस्थिती आता दिवसेंदिवस आणखी दयनीय होत असून आयएमएफसह सर्व मित्र राष्ट्रांकडून मिळालेली आर्थिक मदतही पाकड्यांना या संकटातून वाचवू शकत नाही. आता परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की शाहबाज शरीफ सरकारला पाकिस्तानची सरकारी विमान कंपनी पीआयए विकावी लागली आहे. 135 अब्ज पाकिस्तानी रुपयांना, म्हणजे अगदी कवडीमोल भावात PIA एअरलाइन्स विकली गेली असून पाकिस्तानने मंगळवारी राष्ट्रीय ध्वजवाहकाची खाजगीकरण प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली आणि पाकिस्तान इंटरनॅशनल एअरलाइन एका स्थानिक गुंतवणूक कंपनीच्या नेतृत्वाखालील कन्सोर्टियमला विकली. एकेकाळी पाकिस्तानचा अभिमान असलेली पाकिस्तान इंटरनॅशनल एअरलाइन्सची मालकी आता सरकारच्या हातून निघाली आहे.सरकारी मालकीच्या कंपन्यांमध्ये भागीदारी मिळवण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या आरिफ हबीब इन्व्हेस्टमेंट फर्मच्या नेतृत्वाखालील एका संघाने PIA एअरलाइन्सचा ताबा घेतला असून या कंपनीचे संस्थापक भारतातील गुजरातचे आहेत. पाकिस्तान इंटरनॅशनल एअरलाइन्स एकेकाळी जगातील सर्वोत्तम विमान कंपन्यांपैकी एक मानली जायची, पण खराब व्यवस्थापनामुळे गेल्या काही वर्षांपासून संघर्ष सुरु झाला आणि बराच काळ तोटा सहन केल्यावर सरकारला नकोस पाऊल उचलणं भाग पडलं. या लिलावात तीन कंपन्यांनी बोली लावली: आरिफ हबीब, लकी सिमेंट आणि एअरब्लू. लकी सिमेंटशी जवळच्या स्पर्धेनंतर आरिफ हबीबने लिलाव जिंकला. सरकारने संदर्भ किंमत 100 अब्ज रुपये ठेवली होती. एअरब्लूने 26.5 अब्ज रुपयांची सर्वात कमी बोली लावली होती. आरिफ हबीब ग्रुपने 13,500 कोटी रुपयांची बोली लावून पीआयए एअरलाइन्सचा ताबा घेतला. आरिफ हबीब यांचे कुटुंब मूळचे गुजरातमधील जुनागड जिल्ह्यातील होते, जिथे त्यांचा चहाचा व्यवसाय होता. पण फाळणीच्या वेळी पाकिस्तानच्या कराचीला स्थायिक झाले. आरिफ हबीब यांचा जन्म कराची येथे झाला आणि कराची स्टॉक एक्सचेंजमध्ये स्टॉक ब्रोकर म्हणून कारकिर्द सुरू केली.

### गरिबीतून बाहेर काढणारा शेअर, गुंतवणूकदारांना लॉटरी! 50 रुपयांचा स्टॉक बनला मल्टीबॅगर



शेअर बाजारातील गुंतवणूक धोकादायक मानली जात असली तरी, असे अनेक स्टॉक्स आहेत जे गुंतवणूकदारांसाठी पैसा छापायची मशीन बनले आहेत. असाच एक स्टॉक डिफेन्स क्षेत्र म्हणजे संरक्षण क्षेत्रातील कंपनी, अॅस्ट्रा मायक्रोवेव्हचा आहे. गुंतवणूकदारांना मल्टीबॅगर परतावा देणाऱ्या या स्टॉकची किंमत कधीकाळी फक्त 50 रुपये होती, जी आता 950 रुपयांच्या वर उसळली आहे. यामुळे केवळ कंपनीचा नव्हे तर या स्टॉकमध्ये गुंतवणूक करणारेही धनवान झाले आहेत. देशभरात कोविड-19 चा संसर्ग पसरत असताना अॅस्ट्रा मायक्रोवेव्ह डिफेन्सच्या स्टॉकची किंमत फक्त 50 रुपये होती. पण भारतीय अर्थव्यवस्थेच्या जलद पुनर्प्राप्ती आणि जलद प्रगतीसह या संरक्षण स्टॉकनेही वेगाने वाढ केली आणि गुंतवणूकदारांना जोरदार परतावा दिला. आदल्या दिवशी, मंगळवारी, 1.68% वाढून 951 रुपयांवर स्थिरावला तर बुधवारी चढ-उताराच्या बाजारात 971 रुपयांवर पोहोचला असून 1195.90 रुपये या शेअरचा उच्चांक आहे. या डिफेन्स स्टॉकने गुंतवणूकदारांना 1,800% इतका प्रचंड परतावा देऊन 50 रुपयांवरून 950 रुपयांवर झेप घेतली. या काळात गुंतवणूकदारांनी कमावलेल्या नफ्याचा हिशोब लावल्यास एखाद्या गुंतवणूकदाराने कोविड-19 च्या काळात अॅस्ट्रा मायक्रोवेव्ह स्टॉकमध्ये फक्त 1,00,000 रुपये गुंतवले असते आणि आतापर्यंत गुंतवणूक सुरूच ठेवली असेल तर, त्याचे मूल्य रु. 1,90,000 पर्यंत वाढले असते.

1991 मध्ये स्थापन झालेली आणि हैदराबादमध्ये मुख्यालय असलेली अॅस्ट्रा मायक्रोवेव्ह ही संरक्षण, दूरसंचार आणि अवकाशासाठी रेडिओ फ्रिक्वेन्सी सिस्टीम, मायक्रोवेव्ह चिप्स आणि मायक्रोवेव्ह-आधारित उपप्रणालींच्या विस्तृत श्रेणीची आघाडीची डिझायनर आणि उत्पादक आहे. कोविड-19 च्या काळातील स्टॉकची रिकव्हरी ब्रोकरेज कंपन्या उत्साही दिसत असून सकारात्मक अभिप्राय देत आहेत आणि आणखी वाढीची अपेक्षा करत आहेत.

# टी-20 गोलंदाजांच्या क्रमवारीत बुमराहची 10 स्थानांची झेप

## फलंदाजांत तिलक वर्मा तिसऱ्या क्रमांकावर; टेस्टमध्ये ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स दुसऱ्या स्थानावर




टी-20 गोलंदाजांच्या क्रमवारीत भारतीय वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने 10 स्थानांची झेप घेतली आहे. बुधवारी जाहीर झालेल्या आयसीसी क्रमवारीत बुमराह 18व्या स्थानावर पोहोचला आहे. त्याचे 622 रेटिंग गुण आहेत. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळल्या गेलेल्या पाच सामन्यांच्या टी-20 मालिकेतील शेवटच्या सामन्यात बुमराहने 2 बळी घेऊन भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

भारताने ही मालिका 3-1 ने जिंकली होती, तर लखनऊमध्ये खेळला गेलेला चौथा सामना धुक्यामुळे रद्द करावा लागला होता. अहमदाबादमध्ये झालेल्या निर्णायक सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना 231 धावांचा मोठा डोंगर उभा केला. या सामन्यात तिलक वर्माने 42 चेंडूत 73 धावांची धमाकेदार खेळी केली. या शानदार कामगिरीनंतर तिलक वर्माने श्रीलंकेच्या पथुम निसांकाला मागे टाकत 805 रेटिंग गुणांसह फलंदाजांच्या क्रमवारीत तिसरे स्थान पटकावले.

त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेच्या डेवाल्ड ब्रेविसलाही त्याच्या कामगिरीचा फायदा मिळाला. त्याने वेगवान 31 धावांची खेळी केली, ज्यामुळे त्याने पाच स्थानांची झेप घेऊन टॉप-10 फलंदाजांमध्ये स्थान मिळवले.

**वरुण नंबर-1 वर कायम**

टी-20 बॉलर्स रँकिंगमध्ये भारताच्या वरुण चक्रवर्तीने आपले अव्वल स्थान आणखी मजबूत केले आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत तो सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज ठरला आणि त्याने एकूण 10 बळी घेतले. यात शेवटच्या टी-20 सामन्यात घेतलेल्या 4 विकेट्सचाही समावेश आहे. उत्कृष्ट कामगिरीचा परिणाम रँकिंगमध्ये स्पष्टपणे दिसून आला, जिथे वरुणचे 804 रेटिंग पॉइंट्स आहेत. तो दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या न्यूझीलंडच्या जेकब डफी (699) पेक्षा खूप पुढे आहे.

**अभिषेक शर्मा अव्वल स्थानी**

टी-20 बॅटर्स रँकिंगमध्ये अभिषेक शर्मा नंबर-1 वर आहे. इंग्लंडचा सलामीवीर फिल सॉल्ट दुसऱ्या स्थानावर कायम आहे. तर 805 रेटिंग पॉइंट्ससह तिलक वर्मा तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे.

**टेस्टमध्ये ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडच्या खेळाडूंना फायदा**

ताज्या ICC रँकिंगमध्ये ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडच्या खेळाडूंना मोठा फायदा झाला आहे. अॅशेस मालिकेत ऑस्ट्रेलियाच्या विजयाचा आणि वेस्ट इंडिजविरुद्ध न्यूझीलंडच्या उत्कृष्ट कामगिरीचा परिणाम रँकिंगमध्ये स्पष्टपणे दिसून आला आहे.

अॅडलेड टेस्टमध्ये 82 धावांनी विजय मिळवताना ट्रॅव्हिस हेड ऑस्ट्रेलियाच्या विजयाचे नायक ठरले. त्यांनी दुसऱ्या डावात 219 चेंडूंमध्ये 170 धावांची शानदार खेळी केली. या कामगिरीमुळे हेड चार स्थानांची झेप घेऊन 815 रेटिंग पॉइंट्ससह संयुक्तपणे तिसऱ्या क्रमांकावर पोहोचले आहेत, जिथे ते स्टीव्ह स्मिथसोबत आहेत.

विकेटकीपर-फलंदाज अॅलेक्स कॅरीने पहिल्या डावात शतक झळकावले, त्यानंतर तो सहा स्थानांनी वर चढून नवव्या क्रमांकावर पोहोचला. हे त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम रेटिंग (737) आहे.

**न्यूझीलंडच्या फलंदाजांची दमदार झेप**

न्यूझीलंडच्या विजयाचा पाया त्यांची मजबूत फलंदाजी होती. रचिन रवींद्रने 72* आणि 46 धावांच्या खेळी केल्या, ज्यामुळे तो पाच स्थानांनी वर चढून 13व्या क्रमांकावर पोहोचला. तर डेव्हॉन कॉन्वेने 227 आणि 100 धावांच्या शानदार खेळींच्या जोरावर 681 रेटिंग गुणांसह कारकिर्दीतील सर्वोत्तम 17व्या स्थानावर स्थान मिळवले.

वेस्ट इंडिजकडून कावेम हॉजने नाबाद 123 धावा केल्या, ज्याचा त्यालाही फायदा झाला. तो 11 स्थानांनी वर चढून 66व्या क्रमांकावर पोहोचला आहे. हे त्याचे आतापर्यंतचे सर्वोत्तम रँकिंग स्थान आहे.

टेस्ट बॉलिंग रँकिंगमध्ये ऑस्ट्रेलियाचे दोन गोलंदाज आता नंबर-1 जसप्रीत बुमराह यांना कडवे आव्हान देत आहेत.

# रेप केसमध्ये क्रिकेटर यश दयालला अटकेची शक्यता

## जयपूर कोर्टाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला




आयपीएल चॅम्पियन रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु (RCB) चा वेगवान गोलंदाज यश दयाल याला अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याच्या प्रकरणात जयपूरच्या पॉक्सो कोर्टातून धक्का बसला आहे. जयपूर महानगर प्रथमच्या पॉक्सो कोर्ट-3 ने यशचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला आहे. आता यश दयालला कधीही अटक होऊ शकते.

न्यायाधीश अलका बन्सल यांनी आदेशात म्हटले- प्रथमदर्शनी आरोपीला खोट्या आरोपांमध्ये गोवण्यात आले आहे, असे वाटत नाही. आतापर्यंतच्या तपासात आरोपीचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे दिसून येते. आरोपीची चौकशी होणे बाकी आहे. अशा परिस्थितीत या टप्प्यावर आरोपीला अटकपूर्व जामिनाचा लाभ दिला जाऊ शकत नाही.

23 जुलै 2025 रोजी जयपूरच्या सांगानेर सदर पोलीस ठाण्यात यशविरुद्ध क्रिकेटमध्ये करिअर घडवण्याचे आमिष दाखवून आणि भावनिक ब्लॅकमेल करून अल्पवयीन मुलीवर अडीच वर्षे बलात्कार केल्याचा गुन्हा दाखल झाला होता.

**पीडितेच्या मोबाईलमध्ये चॅट, फोटो आणि व्हिडिओ सापडले**

पीडितेचे वकील दिवेश शर्मा यांनी सांगितले की, गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी पीडितेच्या आणि आरोपीच्या मोबाईलची सीडीआर (CDR) जप्त केली. यात दोघांमध्ये संभाषण झाल्याची पुष्टी होते. यासोबतच पीडितेने सांगितलेल्या हॉटेल्समध्ये दोघे थांबल्याची नोंदही आहे.

पीडितेच्या मोबाईलमधून मिळालेल्या चॅट, फोटो आणि व्हिडिओच्या विश्लेषणातून आरोपीविरुद्ध पॉक्सो (POCSO) अंतर्गत गुन्हा दाखल होतो. त्यांनी कोर्टाला सांगितले की, आरोपीने 3-4 मे 2023 रोजी जयपूरमध्ये आयपीएल (IPL) सामना खेळत असताना पीडितेला रेल्वे स्टेशनजवळच्या हॉटेलमध्ये भेटायला बोलावले आणि लैंगिक संबंधांसाठी सांगितले.

पीडितेने नकार दिल्यावर, त्याने तिच्या वडिलांच्या केसमध्ये आर्थिक आणि भावनिक मदत करण्याचे, कानपूरमध्ये क्रिकेट अकादमी जॉईन करून देण्याचे आमिष दाखवून 2-3 सप्टेंबर 2023 रोजी कानपूर (यूपी) येथे बोलावून तिच्यावर हॉटेलमध्ये बलात्कार केला.

आरोपी क्रिकेटपटूचे वकील कुणाल जैमन यांनी सांगितले की, आरोपीने पीडितेची नेहमी सार्वजनिक ठिकाणी आणि संघातील इतर सदस्यांच्या उपस्थितीत भेट घेतली आहे. ते एकांत ठिकाणी कुठेही एकटे भेटले नाहीत.

पीडितेने आरोपीला कधीही सांगितले नाही की तिचे वय 18 वर्षांपेक्षा कमी आहे. एफआयआरमध्येही तिने हे सांगितले नाही की जेव्हा तिच्यावर पहिल्यांदा बलात्कार झाला, तेव्हा ती अल्पवयीन होती.

# विराट कोहली-रोहित शर्माची शतके:विजय हजारे ट्रॉफीमध्ये कोहली 118 धावांवर नाबाद, रोहितने 155 धावा केल्या

विराट कोहली आणि रोहित शर्माने विजय हजारे ट्रॉफीमध्ये आपापल्या संघांसाठी शतके झळकावली. बुधवारी बंगळुरूमध्ये दिल्लीकडून खेळणाऱ्या विराट कोहलीने शतक पूर्ण केले आहे. या सामन्यात आंध्र प्रदेशविरुद्ध २९९ धावांचा पाठलाग करणाऱ्या दिल्लीने ३० षटकांत २ गडी गमावून २४५ धावा केल्या आहेत. कोहली ११८ आणि नितीश राणा ५१ धावांवर नाबाद आहेत.

इकडे, जयपूरच्या सवाई मानसिंह स्टेडियममध्ये मुंबईने रोहितच्या शतकाच्या जोरावर सिक्कीमवर ८ गडी राखून विजय मिळवला. रोहितने ९४ चेंडूंमध्ये धडाकेबाज १५५ धावा केल्या. ही स्पर्धा रोहित आणि कोहली दोघांसाठीही महत्त्वाची आहे, कारण हे दोघे आता फक्त एकदिवसीय क्रिकेटच खेळतात. अशा परिस्थितीत दोघांनाही स्वतःला सिद्ध करून संघात आपले स्थान टिकवून ठेवण्याची संधी आहे.

बंगळुरू येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये चाहत्यांना प्रवेश दिला नाही. तर जयपूरमध्ये रोहितची खेळी पाहण्यासाठी मोठ्या संख्येने चाहते उपस्थित होते. बंगळुरूमध्ये सुरू असलेल्या सामन्यात विराट कोहलीने शतक पूर्ण केले आहे. त्याची टीम दिल्ली आंध्र प्रदेशविरुद्ध 298 धावांचे लक्ष्य गाठत आहे. टीमने 30 षटकांत दोन गडी गमावून 245 धावा केल्या आहेत. विराट कोहली 118 धावांवर आणि नितीश राणा 51 धावांवर नाबाद आहेत.

कोहलीने विजय हजारे ट्रॉफीमध्ये शेवटचा सामना फेब्रुवारी 2010 मध्ये सर्व्हिसेसविरुद्ध खेळला होता. तर, रोहित 7 वर्षांनंतर विजय हजारे ट्रॉफी खेळणार आहे. त्याने शेवटची स्पर्धा 2018 मध्ये खेळली होती. दोघेही आता टीम इंडियासाठी फक्त वनडे फॉरमॅटमध्ये खेळतात. रोहित आणि विराट टी-20 क्रिकेट आणि कसोटीतून निवृत्त झाले आहेत.

**बीसीसीआयने देशांतर्गत सामने खेळण्यास सांगितले होते**

बीसीसीआयने रोहित शर्मा आणि विराट कोहलीला सांगितले होते की, वनडे संघात आपले स्थान टिकवून ठेवण्यासाठी त्यांना देशांतर्गत स्पर्धांमध्ये भाग घ्यावा लागेल.

बीसीसीआयने सांगितले होते की, बोर्ड आणि टीम मॅनेजमेंटने दोन्ही खेळाडूंना स्पष्ट केले आहे की, जर त्यांना भारतासाठी खेळणे सुरू ठेवायचे असेल, तर त्यांना देशांतर्गत क्रिकेट खेळावे लागेल.

2024-25 च्या रणजी हंगामात रोहित आणि कोहलीने प्रत्येकी एक रणजी सामना खेळला होता. जानेवारीमध्ये कोहली 12 वर्षांनंतर दिल्लीसाठी खेळला होता, तर रोहितने 10 वर्षांनंतर मुंबईकडून सामना खेळला होता.

**विजय हजारे ट्रॉफीसाठी दिल्ली संघ**

ऋषभ पंत (कर्णधार), आयुष बडोनी (उपकर्णधार), विराट कोहली, अर्पित राणा, यश धुल, सार्थक रंजन, प्रियांश आर्य, तेजस्वी सिंग (यष्टीरक्षक), नीतीश राणा, रितिक शौकीन, हर्ष त्यागी, सिमरजीत सिंग, प्रिन्स यादव, दिविज मेहरा, आयुष डोसेजा, वैभव कांडपाल, रोहन राणा, इशांत शर्मा, नवदीप सैनी. अनुज रावत (राखीव यष्टीरक्षक).

शार्दुल ठाकूर (कर्णधार), रोहित शर्मा (2 सामने), हार्दिक तामोर, मुशीर खान, सरफराज खान, इशान मुलचंदानी, शम्स मुलानी, तनुष कोटियान, अंगकृष रघुवंशी, तुषार देशपांडे, ओंकार तरमले, सिद्धेश लाड, सिल्वेस्टर डिसूझा, साईराज पाटील, आकाश आनंद, सूर्यांश शेडगे.




# भारताविरुद्धच्या मालिकेसाठी न्यूझीलंड संघ जाहीर:मायकेल ब्रेसवेल एकदिवसीय कर्णधार, विल्यमसनला विश्रांती; सँटनर टी-20 संघाचा कर्णधार




न्यूझीलंड क्रिकेटने भारतासोबतच्या 3 एकदिवसीय आणि 5 टी-20 सामन्यांच्या मालिकेसाठी आपला संघ जाहीर केला आहे. 15 सदस्यीय युवा एकदिवसीय संघाचे कर्णधारपद अष्टपैलू मायकेल ब्रेसवेल भूषवतील. तर अनुभवी केन विल्यमसन आणि नियमित कर्णधार मिचेल सँटनर यांना विश्रांती देण्यात आली आहे. मात्र, सँटनर टी-20 मालिकेत कर्णधारपद सांभाळतील.

**नवीन खेळाडूंना संधी**

न्यूझीलंडने एकदिवसीय संघात बहुतांश नवीन खेळाडूंना संधी दिली आहे. यामध्ये आदी अशोक, ख्रिश्चन क्लार्क, जोश क्लार्कसन, झॅक्री फॉल्क्स, निक केली, जेडन लेनोक्स आणि मायकेल रे यांचा समावेश आहे. अनुभवी खेळाडूंमध्ये ब्रेसवेल व्यतिरिक्त डेव्हॉन कॉनवे, काईल जेमिसन, डॅरिल मिचेल, हेन्री निकोल्स, ग्लेन फिलिप्स आणि विल यंग यांचा समावेश आहे.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात वनडे मालिका ११ जानेवारीपासून सुरू होईल. १४ आणि १८ जानेवारी रोजी उर्वरित २ सामने खेळले जातील. वडोदरा, राजकोट आणि इंदूरमध्ये तिन्ही सामने होतील. दोन्ही संघ त्यानंतर २१ ते ३१ जानेवारीपर्यंत ५ टी-२० सामन्यांची मालिकाही खेळतील. या मालिकेच्या ६ दिवसांनंतरच भारत आणि श्रीलंकेत टी-२० विश्वचषक सुरू होईल.

**वनडे मालिकेसाठी न्यूझीलंडचा संघ**

मायकेल ब्रेसवेल (कर्णधार), आदी अशोक, कृश्चन क्लार्क, जोश क्लार्कसन, झॅक्री फॉल्क्स, निक केली, जेडन लेनोक्स, मायकेल रे, डेव्हॉन कॉन्वे, काइल जेमिसन, डॅरिल मिचेल, हेन्री निकोल्स, ग्लेन फिलिप्स आणि विल यंग.

**टी-20 मालिकेसाठी न्यूझीलंड संघ**

मिचेल सँटनर (कर्णधार), मायकेल ब्रेसवेल, मार्क चॅपमन, डेव्हॉन कॉन्वे (यष्टीरक्षक), जेकब डफी, झॅक्री फॉल्क्स, मॅट हेन्री, काइल जेमिसन, बेव्हॉन जेकब्स, डॅरिल मिचेल, जिमी नीशाम, ग्लेन फिलिप्स, रचिन रवींद्र, टिम रॉबिन्सन, ईश सोढी.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) टी-२० मालिका आणि विश्वचषकासाठी संघ जाहीर केला आहे, परंतु एकदिवसीय मालिकेसाठी संघाची घोषणा जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत होईल. विराट कोहली आणि रोहित शर्मा यांसारखे दिग्गज या मालिकेत खेळताना दिसतील. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध जखमी झालेले कर्णधार शुभमन गिल पुन्हा एकदा संघाचे नेतृत्व

## महत्त्वाचे...

### थर्टी फर्स्टला भागवत एकादशी; रात्री 1:48 वाजेपर्यंत उपवास



मुंबई - २०२५ ला निरोप देताना आणि २०२६ चे स्वागत करताना यंदा मटण चिकनचा बेत आखणाऱ्यांची दांडी गुल होणार आहे. कारण यंदाच्या थर्टी फर्स्टला भागवत एकादशी आहे. ३१ डिसेंबरच्या रात्री १ वाजून मिनिटांपर्यंत एकादशीचा काळ असल्याने तळीराम आणि मांसाहारप्रेमींना यंदा नववर्षाचे स्वागत सात्त्विक पदार्थांनीच करावे लागणार आहे. नववर्षाच्या पूर्वसंध्येला शहरात मोठ्या प्रमाणात मांसाहार आणि पार्थ्यांचे आयोजन केले जाते. मात्र, यंदा ३० डिसेंबर आणि ३१ डिसेंबर असे सलग दोन दिवस एकादशी आल्याने मोठा पेच निर्माण झाला आहे. विशेषतः ग्रामीण आणि शहरी भागातही अनेक कुटुंबांमध्ये एकादशीला मांसाहार वर्ज्य असतो. त्यामुळे ज्यांनी पार्थ्यांचे बेत आखले, त्यांच्यासाठी हॉटेलचालकांनी उपवासाच्या पदार्थांची व्यवस्था केली. एकादशी आणि ३१ डिसेंबरचा असा योग तब्बल ६ वर्षांनंतर आला आहे. २०१९ पासून ३१ डिसेंबरला कधीही एकादशी आली नव्हती. यंदा मात्र सलग दोन दिवस एकादशी आल्याने शैव आणि वैष्णव अशा दोन्ही संप्रदायांचे पालन करणाऱ्यांना उपवास धरावा लागणार आहे. ३० तारखेला शैव संप्रदायाची तर ३१ तारखेला वैष्णव संप्रदायाची एकादशी असल्याने सेलिब्रेशनच्या उत्साहावर धार्मिकतेचा ब्रेक लागला आहे.

### खाटू श्याम दर्शनानंतर मांजाची तस्करी...

मुंबई - खाटू श्याम येथे २ महिन्यांपूर्वी दर्शनासाठी गेलेल्या एका तरुणाने इंदूरला जाऊन नायलॉन मांजाच्या तस्करीचे जाळे विणल्याचा प्रकार समोर आला आहे. इंदूरहून १ लाख ९० हजारांचे नायलॉन मांजाचे २८८ गट्टू कुरियरने मागवणाऱ्या २ तरुणांना गुन्हे शाखेने बेड्या मंगळवारी (२३ डिसेंबर) ठोकल्या. दोघांवर सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे. ऋतिक दिलीप लोधे (२२, रा. बन्सीलालनगर) आणि गणेश रामकिसन औताडे (२२, रा. धेरडा, ता. गंगापूर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. ऋतिक हा पतंग विक्रेता आहे. मंगळवारी एका कुरियरद्वारे आलेले मांजाचे पार्सल तो कारमधून नेत असल्याची माहिती गुन्हे शाखेचे निरीक्षक गजानन कल्याणकर यांना खबऱ्याने दिली. त्यावरून पद्मपुरा भागात ही कारवाई केली. प्रतिबंधित मांजा सुरक्षितपणे आणण्यासाठी आरोपींनी कुरियरचा मार्ग निवडला. कुरियर कंपनीतून पार्सल आणण्यासाठी ऋतिक आणि गणेश गेले. तेथून पार्सल घेऊन जात असताना गुन्हे शाखेच्या पोलिसांनी त्यांना पकडले. पोलिसांना ६ पोत्यात मांजाचे २८८ गट्टू आढळले. दोघांवर वेदांतनगर ठाण्यात गुन्हा नोंदविला.इनसाइड स्टोरी: सुरतहून मिळाला इंदूरच्या मांजा विक्रेत्याचा नंबर पतंग विक्रेता ऋतिक लोधे २ महिन्यांपूर्वी खाटू श्याम दर्शनासाठी गेला होता. दर्शनानंतर तो नायलॉन मांजाच्या शोधात सुरतला गेला. तेथे एका रिक्षाचालकाने त्याला इंदूरच्या नासेर नावाच्या तस्कराचा मोबाइल नंबर दिला. ऋतिक आणि नासेर यांच्यात वारंवार बोलणे झाले. नासेर आपली ओळख लपवण्यासाठी दरवेळी वेगवेगळ्या नंबरवरून संपर्क साधत असे. ऋतिकने इंदूरला जाऊन १ लाख ९० हजार ६०० रुपयांच्या मांजाची ऑर्डर दिली.

# प्रशांत जगताप यांचा अखेर राजीनामा

## राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे शहराध्यक्ष पद सोडले; मनपा निवडणूक लढवण्याची घोषणा

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई - माजी महापौर प्रशांत जगताप यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या शहराध्यक्ष पदाचा आणि पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी आपला राजीनामा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला. पुणे येथे पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली.

बदलत्या राजकीय घडामोडींमध्ये कोणती भूमिका घ्यावी, याबाबत अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या घालमेलीमुळे सद्सद्विवेकबुद्धीला स्मरून हा निर्णय घेतल्याचे जगताप यांनी सांगितले. या राजीनाम्याचे कोणतेही दूरगामी परिणाम नसून, त्यांना कोणताही राजकीय लाभ अपेक्षित नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पक्षाचे कार्यालय त्यांच्या नावावर असले तरी त्यावर आता त्यांचा कोणताही अधिकार नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

प्रशांत जगताप यांनी आपण राजकारण आणि समाजकारण सोडणार नसल्याचे जाहीर केले. आगामी महानगरपालिका निवडणूक लढवणार असून, कोणत्याही पक्षाचे सरकार असले तरी आपण निवडणूक लढवत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. पक्षाला अंधारात न ठेवता आपण बाहेर पडत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रशांत जगताप म्हणाले, 27 वर्षांपूर्वी मी सामाजिक व राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवले, तेव्हा कुठल्या पदासाठी नव्हे, तर पुरोगामी विचारांची चळवळ पुढे नेण्यासाठी मी कार्यरत झालो. आज 27 वर्षांनंतरही हेच एकमेव ध्येय माझ्या मनात आहे. यापुढेही पुरोगामी विचारांसाठी माझी सामाजिक व राजकीय वाटचाल सुरूच असेल असे जगताप म्हणाले. आजपर्यंत अत्यंत निष्ठेने मला साथ देणाऱ्या, यापुढेही संघर्षाच्या वाटेवर माझ्यासोबत येणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे मनापासून आभार जगताप यांनी मानले. यावेळी त्यांनी केवळ शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या आठवणी सोबत घेऊन जात असल्याचे भावनिक उद्गार काढले.

१० जून १९९९ रोजी शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात करोडो लोक सहभागी झाले होते, त्यापैकी आपण एक असल्याचे जगताप यांनी सांगितले. २६ वर्षे, सहा महिने आणि ११ दिवस त्यांना पक्षात काम करता आले. या काळात त्यांना अनेक पदे मिळाली आणि पक्षाने त्यांना संधी दिली.

वानवडी भागात आणि पुण्यातील नागरिकांनी त्यांना नेहमी साथ दिली. कोणत्याही पक्षावर आपला वैयक्तिक राग नसून, विविध आंदोलनांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. हडपसर विधानसभा मतदारसंघात पराभूत होऊनही त्यांना एक लाख २७ हजार मते मिळाली होती, ज्याचे श्रेय त्यांनी कार्यकर्त्यांच्या कष्टाला दिले.

राजीनाम्यानंतर आपल्या मतदारसंघातील नागरिकांशी चर्चा करून निवडणूक कशी लढवायची, याचा निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. पक्षाने कोणतीही विशिष्ट गोष्ट केली म्हणून आपण हा राजीनामा देत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रशांत जगताप यांनी ट्विट करत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. आज राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या शहराध्यक्षपदावरून पायउतार होण्याचा आणि त्याचवेळी पक्ष सदस्यत्वाचा राजीनामाही देण्याचा माझा निर्णय अतिशय शांत चित्त आणि स्पष्ट सद्सद्विवेकबुद्धीचा कौल यांचा परिपाक आहे. कुठलंही पद अथवा निवडणूक अशी तात्कालिक कारणे नव्हेत; तर तत्त्वांचं मनात चाललेलं द्वंद्व मला या निर्णयापर्यंत घेऊन आलं. राजकीय सत्ता ही तेव्हाच अर्थपूर्ण असते, जेव्हा ती सर्वसामान्य माणसाच्या स्वातंत्र्याचं आणि प्रतिष्ठेचं रक्षण करते, असं मला



वाटतं.

आजतागायत मी याच विचारांनी माझं समाजकारण - राजकारण करत आलो आहे. जात-धर्म-भाषा यांच्यापलीकडे जाऊन सर्व भारतीयांच्या कल्याणाचा विचार, हाच खऱ्याखुऱ्या राष्ट्रवादाचा पाया आहे. आपल्या संविधानाने पाहिलेलं विविधरंगी, पण एकात्म भारताचं स्वप्न शतखंडीत करू पाहणारे लोक दुर्दैवाने आज सत्तेवर आहेत. त्यामुळे सत्तेसाठी जुळवल्या जाणाऱ्या इतर कुठल्याही समीकरणांपेक्षा संविधानाने मांडलेलं हे साधं अंकगणित मस्तकात बाळगून फिरणाऱ्या संविधाननिष्ठ कार्यकर्त्यांपैकी मी एक आहे. आज भूमितीय वेगाने वाढत चाललेल्या बहुसंख्याकवाद, धार्मिक उन्माद आणि द्वेषाच्या राजकारणाला माझ्या गणितात अजिबात जागा नाही. त्यामुळे माझी बांधिलकी ही इथल्या सर्वसामान्य जनतेशी होती, आहे आणि राहील. त्याला कुठल्याही पक्षीय चौकटीची गरज नाही. कारण, सार्वजनिक सत्तापदे ही लोकशाही संस्था, नागरी स्वातंत्र्य आणि कायद्याचे राज्य यांच्या संरक्षणासाठी वापरायची असतात, या तत्त्वावर माझी नितांत श्रद्धा आहे.जेव्हा घटनात्मक, सर्वसमावेशक राजकारण आणि द्वेषप्रेरित राजकारण यांच्यातील सीमारेषा धूसर होऊ लागतात, तेव्हा अशा परिस्थितीत तात्त्विक तडजोडी करत बसण्याऐवजी अंतर्मुख होऊन विचार करणे आणि सोपविलेल्या जबाबदारीपासून दूर जाणे, हेच श्रेयस्कर असते. त्यामुळे माझा राजीनामा ही व्यक्ती अथवा संघटनेबद्दलची निषेधात्मक कृती आहे, असे समजण्याचे कारण नाही. समतावादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी विचारांवर ठाम राहण्यासाठी मनाने दिला तो निःसंदिग्ध कौल आहे. माझ्यावर विविध जबाबदाऱ्या सोपवून विश्वास दाखवणारे माझे नेते, सहकारी आणि पक्ष कार्यकर्ते यांचा मी सदैव ऋणी आहे.

## मुंबईला गुजरातच्या दावणीला बांधण्याचा प्रयत्न

### कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांची भाजपवर टीका

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

महाराष्ट्रावर,मुंबईवर अतिक्रमण सुरू आहे. मुंबई बळकावण्याचा, मुंबईला गुजरातच्या दावणीला बांधण्याचे काम सुरू आहे.त्यामुळे मुंबई वाचवण्यासाठी, तिचे रक्षण करण्यासाठी लढले पाहिजे अस कॉंग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार म्हणाले.नागपुरात माध्यमांशी बोलताना वडेट्टीवार यांनी महायुती सरकारच्या धोरणावर टीका केली. मुंबईतील जमिनी गिळण्याचे काम सुरू आहे,मुंबईवर गुजरातचे नियंत्रण आता दिसू लागले आहे.त्यामुळे मराठी अस्मिता, मराठी संस्कृती रक्षणासाठी लढावे लागणार. मुंबईत उद्धवजी ठाकरे आणि राज ठाकरे हे बंधू एकत्र आले त्यांना आमच्या शुभेच्छा आहेत. कुटुंब एकत्र येत असेल तर आनंदच आहे.मुंबई महापालिका



निवडणुकीसाठी कॉंग्रेसची तयारी ही उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या पक्षाबरोबर निवडणूक लढण्याची होती,मनसे बाबत मात्र जाण्याची कॉंग्रेसची तयारी नव्हती अस वडेट्टीवार यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.विजय वडेट्टीवार यांनी यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत मित्रपक्ष वेगवेगळे लढत असले तरी त्यामुळे इंडिया आघाडी किंवा महाविकास आघाडीला कोणताही धक्का बसणार नसल्याचाही दावा केला. ते म्हणाले, लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडी होती,विधान सभा निवडणुकीत महाविकास आघाडी होती. पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या असतात. नगरपरिषद, नगरपालिका निवडणुकीत महाविकास आघाडी एकत्र लढली नाही, आघाडीचे निर्णय हे स्थानिक पातळीवर असतात. यातून इंडिया आघाडी किंवा महाविकास आघाडीला धक्का लागला अस मानण्याचे कारण नाही.कॉंग्रेस हा पक्ष जातीयवाद, धर्मवाद करत नाही. कॉंग्रेस हा संविधान मानणारा आणि प्रत्येक घटकाला न्याय देणारा पक्ष आहे त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत विकासासाठी आमच्या पाठीशी जनतेने उभे रहावे असे आवाहन यावेळी कॉंग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केले.

## आपली पोरं सांभाळू शकली नाहीत ते मुंबई काय सांभाळणार?

### एकनाथ शिंदेंचा ठाकरे बंधूंच्या युतीवर टोला

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची युती झाली असून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत याची अधिकृत घोषणा केली आहे. ठाकरे बंधूंच्या युतीवर आता शिवसेना शिंदे गटाचे नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टीका केली आहे. आता झालेली युती ही सत्तेसाठी असल्याची टीका त्यांनी केली आहे. तसेच ज्यांना आपली पोरं सांभाळता आली नाही ते राज्य काय सांभाळणार? असा तिखट सवालही शिंदेंनी उपस्थित केला.

एकनाथ शिंदे म्हणाले, काही युत्या या जनतेच्या विकासासाठी होतात, महायुती ही जनतेच्या



विकासासाठी, मुंबईच्या विकासासाठी आहे. पण आता झालेली युती ही सत्तेसाठी आहे. निवडणुका आल्यावरच यांना मराठी माणूस आठवतो, असा टोला शिंदेंनी लगावला आहे. तसेच युती कोणाची कोणाशीही झाली तरी आमची महायुती ही महाराष्ट्रामध्ये मजबुतीने उभी आहे. लोकसभा विधानसभा, नगरपालिकांमध्ये महायुती जिंकली. त्यामुळे अशा सत्तेसाठी झालेल्या युत्यांमुळे काही फरक पडत नाही, असेही शिंदे म्हणाले.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबई महापालिकेकडे यांनी सोन्याची अंडी देणारी कोंबडी म्हणून पाहिली. आता ही कोंबडीच कापून खायचे काम सुरू आहे. ठाकरे बंधूंची झालेली युती ही स्वार्थासाठी आणि अस्तित्व टिकवण्यासाठी आहे. परंतु, जनता त्यांना त्यांची जागा दाखवणार. ठाकरे बंधूंची युती झाली तरीही विठ्ठल आमच्याकडे आहे, असे शिंदे म्हणाले.यांच्याकडे मुंबईच्या विकासाचा अजेंडा नाही. त्यांच्या प्रेस कॉन्फरन्समध्ये विकासावर एकही शब्द बोलले नाहीत. यांचा अजेंडा हा फक्त सत्तेसाठी आहे. बाळसाहेबांचा विचार ज्यांनी सोडला त्यांना राज्यातल्या जनतेने त्यांची जागा दाखवली आहे. असली काय आणि नकली काय हे नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये दाखवले असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

तसेच आम्ही विचारधारेला पुढे घेऊन जाणारे आहोत. मुंबईचा विकास हाच आमचा अजेंडा आहे. त्यांनी मुंबईसाठी काय केले हे सांगावे. मुंबईकर हा मुंबईच्या बाहेर फेकला गेला तो यांच्यामुळे. या मराठी माणसाला मुंबईत परत आणण्याचे काम आम्ही करणार आहोत. त्यांच्या पुनर्विकासाचे काम आम्ही करत आहोत. रमाबाई आंबेडकरमधील 17 हजार घरांचे काम आम्ही मार्गी लावले आहे. त्यांच्याकडे काय अजेंडा आहे? असा सवाल एकनाथ शिंदे यांनी उपस्थित केला.एकनाथ शिंदे म्हणाले, जेव्हा निवडणुका येतात त्यावेळी हे 'मुंबई महाराष्ट्रापासून तोडणार' असा बोर्ड लावतात. मुंबईकर सुज्ञ आहेत, त्यांना विकास पाहिजे आहे. आम्ही घेतलेले निर्णय हे मुंबईकरांच्या हितासाठीचे आहेत.

## ठाकरेंच्या युतीनंतर आता शिंदे नाईकांचे मनोमिलन!

### एकनाथ शिंदे आणि मंत्री गणेश नाईक यांच्यात बंद दाराआड चर्चा, निवडणुकीच्या अनुषंगाने खलबते

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई महापालिकेच्या अनुषंगाने शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेत युतीची घोषणा केली आहे. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचे कट्टर विरोधक समजले जाणारे भाजपचे नेते व मंत्री गणेश नाईक यांच्यातही मनोमिलन होणार असल्याची चर्चा सुरू आहे. एकनाथ शिंदे आणि गणेश नाईक यांच्यात जवळपास 15 मिनिटे बंद दाराआड चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. नवी मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातील इतर महानगरपालिका निवडणुकीच्या संदर्भात दोघांत चर्चा झाल्याची सूत्रांची माहिती आहे.

एकनाथ शिंदे आणि गणेश नाईक हे दोघेही नेते एकमेकांना मंत्रालयात भेटले. येथे दोघांमध्ये बंद दाराआड जवळपास 15 मिनिटे चर्चा झाली. या दोघांमध्ये गेल्या काही दिवसांपासून शीतयुद्ध सुरू होते. परंतु, आजच्या भेटीने एकनाथ शिंदे आणि गणेश नाईक यांचे मतभेद दूर झाले असल्याचे बोलले जात आहे. तसेच महापलिका निवडणुकीच्या अनुषंगाने दोघांचे मनोमिलन होणार असल्याचे बोलले जात आहे.

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी नवी मुंबईत आपले वर्चस्व निर्माण करत गणेश नाईक यांच्या प्रस्थापित राजकारणाला मोठे आव्हान दिले होते. मात्र, राज्यात सत्तांतर होऊन देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री झाल्यानंतर स्थानिक समीकरणे बदलली. फडणवीसांनी गणेश नाईक यांना मंत्रिमंडळात स्थान देऊन त्यांचे राजकीय वजन वाढवले, ज्यातून शिंदे आणि नाईक



यांच्यातील सुप्त संघर्षाला खऱ्या अर्थाने तोंड फुटले.

मंत्रिपद मिळाल्यानंतर गणेश नाईक यांनी थेट मुख्यमंत्री शिंदेंचा बालेकिल्ला असलेल्या ठाण्यात जनता दरबार भरवण्यास सुरुवात केली, ज्यामुळे शिंदे गटाकडून त्यांच्यावर तीव्र टीका झाली. या संघर्षाची धार अधिक तीव्र झाली जेव्हा नाईकांनी नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजपने स्वतंत्रपणे लढावे, असे संकेत दिले. या अंतर्गत वादामुळे महायुतीमधील अस्वस्थता सातत्याने समोर येत होती.

मात्र, सध्या मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई पट्ट्यात ठाकरे बंधूंच्या संभाव्य युतीमुळे महायुतीसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. ही बदलती राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन महायुतीने आता सावध पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. ठाकरे गटाच्या आव्हानाला रोखण्यासाठी अंतर्गत मतभेद बाजूला सारणे आवश्यक असल्यानेच, एकनाथ शिंदे आणि गणेश नाईक यांच्यातील या ताज्या भेटीकडे एक महत्त्वाची राजकीय तडजोड म्हणून पाहिले जात आहे.

## मराठवाड्यात राज ठाकरेंना धक्का

### संभाजीनगरातील निष्ठावान शिलेदार शिंदेंच्या सोबतीला, जिल्हाध्यक्ष सुमित खांबेकरांचा शिवसेनेत प्रवेश

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबईत एकीकडे राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्यासोबत युती केली असतानाच, आता छत्रपती संभाजीनगरमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला (मनसे) मोठे खिंडार पडले आहे. मनसेचे जिल्हाप्रमुख सुमित खांबेकर यांनी आज आपल्या पदाचा राजीनामा देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. सुमित खांबेकर यांच्यासोबत मराठवाड्यातील मनसेच्या अन्य तीन जिल्हाध्यक्षांनीही शिंदे गटाची वाट धरल्याने मराठवाड्यात मनसेला मोठा धक्का बसला आहे.



सुमित खांबेकर हे मनसेच्या स्थापनेपासून राज ठाकरे यांच्यासोबत सावलीसारखे उभे होते. सुरुवातीच्या काळात त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेत (मनविसे) तळमळीने काम केले. त्यांच्या कामाची दखल घेऊन राज ठाकरेंनी त्यांच्यावर जिल्हाध्यक्षपदाची महत्त्वाची जबाबदारी सोपवली होती. 2009 च्या विधानसभा निवडणुकीत खांबेकर यांनी तत्कालीन औरंगाबाद (आताचे छत्रपती संभाजीनगर) पूर्व मतदारसंघातून मनसेच्या तिकीटावर निवडणूकही लढवली होती.

# मराठी माणसाच्या अस्तित्वावर उठलेल्यांना गाडून टाकण्यासाठी युती केली

## मुंबईचा महापौर हा शिवसेना-मनसेचाच असणार; राज ठाकरेंनी मांडली भूमिका

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबईत महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना, या दोन पक्षांची आगामी महापालिका निवडणुकांसाठीची युती घोषित झाली. महाराष्ट्र नवनिर्माण सेना अध्यक्ष म्हणून मी आणि शिवसेना पक्षप्रमुख म्हणून उद्धव ठाकरे अशी आम्ही दोघांनी या युतीची अधिकृत घोषणा संयुक्त पत्रकार परिषदेत केली, अशी माहिती मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी त्यांच्या सोशल मीडिया पोस्टद्वारे केली आहे. राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत युती संदर्भात तसेच आगामी महापालिकेच्या अनुषंगाने आपले मत व्यक्त केले आहे. तसेच मराठी माणसाच्या अस्तित्वावर उठलेल्यांना गाडून टाकण्यासाठी युती केली असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

राज ठाकरे म्हणाले, ही युती बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित होती. आणि या सगळ्याची सुरुवात, मी एका मुलाखतीत दिलेल्या वाक्यातून झाली. कुठल्याही वादापेक्षा आणि भांडणांपेक्षा आपला महाराष्ट्र आणि मराठी माणूस मोठा आहे.' हे माझं वाक्य होतं. हे निव्वळ मुलाखतीतलं वाक्य नाहीये, तर ही तीव्र भावना आहे आणि यातूनच हे २ पक्ष एकत्र आले आहेत. बाकी युतीची घोषणा झाली.

आता कोणाला कुठल्या आणि किती जागा मिळणार याची उत्तरं लवकरच मिळतील. त्यावर आजच्या व्यासपीठावर कुठलीही माहिती सांगितली नाही, कारण त्या तांत्रिक बाबी आहेत.

युती ही किती जागा, कुठल्या जागा यासाठी नाहीये. ती आज मराठी माणसाचं मुंबई आणि परिसर पण उद्या राज्याच्या इतर भागातून अस्तित्व मिटवण्याचा जो प्रयत्न सुरु आहे, त्या शक्तींना गाडून टाकण्यासाठीची ही युती आहे. त्यामुळे जागावाटप आणि त्याचा तपशील योग्य वेळी संबंधित व्यक्ती घोषित करतील.

मुंबईचा महापौर हा महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेनेचा असेल आणि तो निर्विवादपणे मराठीच असेल.

आज वर्तमानपत्रं असोत किंवा वृत्तवाहिन्या, त्यांचे बहुसंख्य संपादक, पत्रकार आणि तिथे काम करणारी इतर मंडळी ही कडवट मराठी प्रेमी आहेत. आणि त्यांना मराठी भाषेच्या विरोधात आणि मराठी माणसाच्या विरोधात जे षडयंत्र सुरु आहे ते आवडत नाहीये. त्यातले अनेक जणं त्यांचा रोष त्यांच्या पत्रकारितेतून व्यक्त करतात, तर



काही खाजगीत व्यक्त होतात. माझी सगळ्यांना विनंती आहे की यावेळेस तुमच्या मालकांना आणि त्यांच्या मालकांना काय वाटतं यापेक्षा तुमच्या सद्सद्विवेक बुद्धीला काय वाटतं, पटतं तेच मांडा, बोला.

ही दोन पक्षांची लढाई नाही तर ही मराठी माणसाची लढाई आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळेस जशी तत्कालीन माध्यमं मराठी माणसाच्या पाठीशी उभी राहिली तसं यावेळेस तुम्ही उभे रहा. कारण मराठी भाषा आणि मराठी माणूस टिकला तर तुमचं अस्तित्व टिकेल. सभांच्या वेळेस मराठी बांधव-भगिनींच्या दर्शनाचा योग येईलच. तोपर्यंत सर्वांना सस्नेह जय महाराष्ट्र, असे राज ठाकरे यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

मुंबईचा महापौर मराठीच होणार आणि आमचाच होणार:राज ठाकरेंचा एल्गार

"कोणत्याही वादापेक्षा आणि भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे," या भावनेतून शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) यांच्यात ऐतिहासिक युती झाल्याची अधिकृत घोषणा आज राज ठाकरे यांनी केली.

मुंबई महापालिकेच्या महासंग्रामासाठी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले असून, "मुंबईचा महापौर मराठीच होणार आणि तो आमचाच असणार," असा बुलंद विश्वास राज ठाकरे यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच त्यांनी फडणवीसांविरुद्ध 'लाव रे तो व्हिडिओ' 2.0 चे संकेत दिलेत.